

दैनिक **राज्य लोकतंत्र**

गणपती बाप्पा मोरया

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१२२ | बुधवार, दि.२७ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये



# बाप्पांच्या आगमनासोबत पावसाचा जोर वाढणार

## महाराष्ट्रावर आणखी संकट आयएमडीकडून पावसाबाबत इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्यात १७ ऑगस्टपासून ते २१ ऑगस्टपर्यंत अतिमुसळधार पाऊस झाला, पावसामुळे राज्यात मोठे नुकसान झाले. अनेक गावांना पुराचा मोठा फटका बसल्याचे पाहायला मिळाला, दरम्यान गेले दोन ते तीन दिवस राज्यात पावसाने उघडीप दिली होती, त्यामुळे मोठा दिलासा मिळाला. मात्र आता राज्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढणार आहे.**

गणेशोत्सव काळात पुणे आणि मुंबईला पाऊस झोडपून काढणार आहे. पुणे, मुंबईसह घाटमाथ्यावर देखील हवामान विभागाकडून अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे, या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाच्या नव्या अंदाजानुसार पुन्हा एकदा कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे, त्यामुळे राज्यात पाऊस जोर पकडण्याची शक्यता आहे.गणेशोत्सव काळात पुणे आणि मुंबईमध्ये जोरदार पाऊस पडण्याची शक्यता



आहे. घाट माथ्यावर देखील पावसाचा जोर वाढणार आहे. त्याचबरोबर कोकणाला पुढील पाच दिवस यलो अलर्ट देण्यात आला असून कोकणातील काही भागात अति मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.हवामान विभागाकडून पुढील चार दिवस मध्य महाराष्ट्र, कोकण तसेच विदर्भात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भाला यापूर्वी देखील पावसाचा मोठा फटका बसला होता, आता पुन्हा एकदा विदर्भाला पावसाचा इशारा देण्यात आल्यानं चिंता वाढली आहे. दुसरीकडे कोल्हापूर जिल्ह्यात देखील काही भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. महाराष्ट्राप्रमाणेच देशातील इतर राज्यांना देखील पावसाचा इशारा देण्यात आला आहे, मध्य प्रदेश, गुजरात, उत्तर प्रदेशच्या काही भागांमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे. कमी दाबाचा ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### आज गणरायाचे आगमण

बीडः राज्यभर नव्हे तर आज देशभर गणरायाचे मोठ्या थांटात आममण होत आहे यासाठी बीडमध्ये बाजारभेठा सजल्या असून ठिक ठिकाणी आरासाचे साहित्य खरेदीसाठी गणेश भक्तांनी बाजारपेठेत मोठी गर्दी केल्याची दिसत आहे. बीड शहरातील सिध्दीविनायक कॉम्पल्याक्स मुर्ती खरेदीसाठी होणारी गर्दी लक्षात घेता पोलिसांनी वाहतुक व्यवस्थेत बदल केला आहे.

### पालकमंत्रीपदावरून सावकारेंची उचलबांगडी

भंडारा :भंडारा जिल्ह्याच्या राजकारणात मोठा भूकंप घडला आहे. संजय सावकारे यांची भंडारा जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरून अचानक हकालपट्टी आणि पंकज भोयर यांची नवे पालकमंत्री म्हणून नियुक्ती यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. सावकारेंच्या डिमोशनमागे नागरिकांचा रोष, शिंदे गटाचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांची वाढती ताकद आणि आगामी निवडणुकीची रणनीती ही प्रमुख कारणे मानली जात आहेत.संजय सावकारे यांच्या पालकमंत्रीपदावरून हटवण्यामागे भंडारा जिल्ह्यातील नागरिकांमधील तीव्र नाराजी हे प्रमुख कारण मानले जाते.

### कंत्राटदार करणार भीक मांगो आंदोलन

नागपूर : शासकीय कंत्राटदारांची सुमारे ८९ हजार कोटी रुपये महायुती सरकारने थकवले आहे. कर्जबाजारी झालेल्या एका युवा कंत्राटदाराने आत्महत्या केली तर वर्धा येथील एका कंत्राटदाराने अंगावर पेट्रोल ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. याची दखल घेऊन राज्याचे उपमुख्य आणि वित्तमंत्री अजित पवार यांनी वर्धा येथे मोठी घोषणा केली होती.यापुढे कंत्राटदारांना चिंता करण्याची गरज पडणार नाही. त्यांची सर्व देणी दिली जाणार असून याकरिता साडेसात हजार कोटींची जुळवाजुळव केली असल्याचा दावा केला होता.

### तानाजी सावंतचे बंधु भाजपमध्ये जाणार

सोलापूर : मागील काही दिवसांपासून तानाजी सावंत यांचे बंधू सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी सावंत भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरू होत्या. अखेर सोलापुरात शिवसेनेला खिंडार पडणार हे निश्चित झालं आहे.सोलापुरातील शिवसेनेच्या कार्यपद्धतीवर नाराज असलेल्या शिवाजी सावंत यांनी गटबाजीला कंटाळून राजीनामा देत असल्याचं सांगितलं. त्यांच्यासह सोलापूर शहर जिल्ह्यातील शिवसेनेच्या ४० पदाधिका–यांनीही राजीनामा दिला असल्याची माहिती आहे.

### जरांगेवर बोलू नका शिंदेंच्या मंत्र्यांना सूचना

मुंबई : गणेशोत्सव आणि मनोज जरांगे यांच्या मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या मंत्र्यांची एक गुप्त बैठक झाल्याची माहिती समोर येत आहे. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाविषयी शिवसेनेच्या मंत्र्यांनी माध्यमांसमोर कोणतंही वक्तव्य करु नये अशी सक्त ताकीद एकनाथ शिंदे यांनी या बैठकीत दिली असल्याची माहिती सूत्रांनी दिली. बोलताना महायुती बाबत समन्वय साधून बोलणं अपेक्षित असल्याचं देखील बैठकीमध्ये चर्चा झाली असल्याची माहिती आहे.

### हायकोर्टाने मनाई करताच सदावर्तेंचा एल्गार

मुंबई; आझाद मैदानावर पूर्वपरवानगीशिवाय कोणालाही आंदोलन करता येणार नाही, असा आदेश मंगळवारी उच्च न्यायालयाने दिला. या पार्श्वभूमीवर वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मनोज जरांगे यांना डिवचले आहे. मनोज जरांगे यांना आता डंके की चोटपर आझाद मैदानात नो एन्ट्री असेल. त्यांनी न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्यास त्यांना सहा महिन्यांची शिक्षा होऊ शकते, असा इशारा गुणरत्न सदावर्ते यांनी दिला.मुद्दा असा आहे, न्यायालयापेक्षा कोणीही मोठं नाही. जरांगेही कायद्यापेक्षा आणि संविधानापेक्षा मोठा नाही असेही ते म्हणाले.

# मुंबईला कूच करण्यापूर्वीच सरकारचे एक पाऊल मागे

## शिंदे समितीला मुदतवाढ;लढ्यातील मृताच्या नातेवाईकांना नौकरी

**मुंबई । प्रतिनिधी**

**मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील हे २९ ऑगस्टपासून मुंबईत मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आमरण उपोषणाचं हत्यार उपसणार आहेत.मात्र त्यापूर्वीस सरकारने आज मराठा आरक्षण उपसमितीची बैठक घेतली या बैठकीत हैदराबाद गॅझेटियर आणि कुणबी नोंद शोधण्यासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या न्यायमूर्ती शिंदे समितीला सहा महिन्याची मुदतवाढ**



**दिली शिवाय आरक्षण लढ्यात मयत झालेल्या व्यक्तीच्या कुटूंबातील एका व्यक्तीस शासकीय नौकरीस घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

जरांगे पाटील आणि त्यांचे हजारो समर्थक राजधानी मुंबईत धडकणार असल्याने सरकारची मोठी अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर मराठा आरक्षणासंदर्भातील विविध मागण्या मान्य करत जरांगे पाटलांच्या आंदोलनाची धार बोथट करण्याचा प्रयत्न सरकारी पातळीवर सुरू असून आज मराठा आरक्षण उपसमितीची महत्त्वपूर्ण बैठक मंत्रालयात पार पडली. या बैठकीनंतर उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. "नव्याने गठीत करण्यात आलेल्या मराठा आरक्षण उपसमितीची आज पहिलीच बैठक होती. यापूर्वी आरक्षणासंदर्भात जी कार्यवाही झालीय त्यामुळे बऱ्यापैकी लोकांना मदत झाली आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांसदर्भात आजच्या बैठकीत प्राथमिक चर्चा झाली. तसंच सातारा, हैदराबाद, बॉम्बे गव्हरमेंटच्या गॅझेटियरसंदर्भात ▶▶ पान २ वर



## खंडोबा दीपमाळ मंदिर अतिक्रमणाच्या विळख्यात

### पुरातत्त्व खात्याचे दुर्लक्ष; इतिहासप्रेमी संतप्त

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील ऐतिहासिक वास्तूंपैकी एक असलेली आणि बीड जिल्हा वासियांचे आराध्य दैवत असलेले श्री खंडोबा दिपमाळ मंदिर अतिक्रमणाच्या विळख्यात अडकले असून, या बाबत अनेक वेळा तक्रारी आणि पाठपुरावा करूनही पुरातत्त्व याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे यावरून पुरातत्व खातं हे निष्क्रिय खातं असल्याचा आरोप होत आहे. मंदिर परिसरातील अपूर्ण कामे व वाढते अतिक्रमण यामुळे असामाजिक घटकांचा वावर वाढला आहे. व या ऐतिहासिक वास्तुचं अस्तित्व ही धोक्यात आलं आहे .ऐतिहासिक दिपमाळा या कोरून ठेवल्याने ▶▶ पान २ वर

### गेवराईतील दगडफेक प्रकरण–पोलीसांनी आक्रमक भूमिका घेतल्याने मोठा अनर्थ ठळला

# प्रा.हाके यांच्यासह १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल



**गेवराई–बीड । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील छत्रपती शिवाजी चौकात दोन गटाकडून एकमेकांवर दगडफेक झाल्याने, पोलिसांनी लाठीचार्ज करून आक्रमक भूमिका घेतली. त्यामुळे, दोन गटातला मोठा अनर्थ ▶▶ पान २ वर

### प्रा.हाकेना पोलिसांनी रोखले

सोमवारी गेवराईमध्ये झालेल्या राड्यानंतर पुन्हा एकदा त्या ठिकाणी जाणाऱ्या लक्ष्मण हाकेंना पोलिसांनी नागझरी फाटा येथे रोखलं. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी हे पाऊल उचललं असून हाके हे जालन्यातील वडीगोद्री या ठिकाणी परत गेले.

### जिल्ह्यात जमावबंदी आदेश

निवासी जिल्हाधिकाऱ्यांनी २६ ऑगस्टच्या मध्यरात्रीपासूनच बीड जिल्ह्यात पुढील पंधरा दिवस जमावबंदीचे आदेश जारी केले आहेत. त्यामुळे पुढील पंधरा दिवस कुठलेही आंदोलन निदर्शने होणार नाहीत. एवढेच नाही तर पाच पेक्षा अधिक जमाव एकत्रित येण्यास देखील मज्जाव घालण्यात आला आहे.

## जरांगेंना धक्का; आझाद मैदानात उपोषण करण्यास हायकोर्टाची मनाई



**मुंबई । प्रतिनिधी**

**मराठा आरक्षणप्रश्नी मनोज जरांगे यांना आझाद मैदान येथे आंदोलन करण्यास मुंबई हायकोर्टाकडून मनाई करण्यात आली आहे. नवी मुंबईत खारघर किंवा अन्यत्र परवानगी देण्याची राज्य सरकारला मुभा असेल, असे मुंबई हायकोर्टाचे एका जनहित याचिकेवरील सुनावणीदरम्यान निर्देश दिले आहेत. त्यामुळे मनोज जरांगे यांची डोकेदुखी वाढली असून ते पुढे काय भूमिका घेतात, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.**

मनोज जरांगे यांनी गणेशोत्सव काळात मुंबईत उपोषणाला येणं टाळावं, अशी विनंती करण्यासाठी आज सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष कार्य अधिकारी राजेंद्र साबळे हे अंतरवाली सराटी इथं दाखल झाले होते. राजेंद्र साबळे यांनी मनोज जरांगे यांच्यासोबत याबाबत ▶▶ पान २ वर

## आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश; आष्टीत अतिरिक्त मुख्य न्यायालय



**आष्टी । प्रतिनिधी**

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आष्टी येथे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) तथा अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय स्थापन करण्याचा ऐतिहासिक निर्णय आज घेण्यात आला.हे न्यायालय व्हावे म्हणून आमदार सुरेश धस हे सतत पाठपुरावा करत असल्याने त्यांचा पाठपुराव्याला आज यश आले आहे.राज्य मंत्रिमंडळाने घोषणा करताच ▶▶ पान २ वर

## स्व.बाबासाहेब आगेच्या पत्नीला भाशिप्र मंडळात कायमस्वरूपी नोकरी

### मुख्यमंत्री फडणवीस व भाजपा आगे परिवाराच्या पाठीशी–डॉ.ओमप्रकाश शेटे

**तलवाडा । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे निष्ठावंत शिलेदार, प्रचारक आणि लोकसभा विस्तारक, स्व. बाबासाहेब आगे यांच्या पत्नी श्रीमती पल्लवी बाबासाहेब आगे (सोळंके) यांना भारतीय शिक्षण प्रसारक मंडळात कायम स्वरुपी नोकरीचे (प्रयोगशाळा परिचर) नियुक्तीपत्र देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप अध्यक्ष रवींद्र चव्हाण साहेब यांच्या हस्ते हे नियुक्तीपत्र मुख्यमंत्री महोदयांच्या सागर या



निवासस्थानी त्यांना सुपूर्द आले. निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समर्पण यांचा आदर्श असलेल्या या उमद्या कार्यकर्त्याच्या कुटुंबाला पक्ष व सरकार वाऱ्यावर ▶▶ पान २ वर

## सोन्याचे दर वाढले

जळगाव: ऐन गणेशोत्सवाच्या आदल्या दिवशी सोन्याचे दर वाढले आहेत. सोन्याच्या दरात जवळपास ५५० रुपयांनी वाढ झाली आहे. सध्या गणेशोत्सवात अनेकजण सोने खरेदी ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२६ ऑगस्ट २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक / आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०१.५० क्विंटल | २,३०० | २,९०० | २,६२५ |
| ज्वारी/हायब्रिड:१००.५० क्विंटल | १,९०० | २,९४० | २,४०४ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : ०.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ६,७०१ | ६,७०१ | ६,७०१ |
| बाजरी: ८०.५० क्विंटल | १,९७१ | २,८७६ | २,५२३ |
| मुग: ८६.५० क्विंटल | ३,५०० | ८,५८५ | ६,६५५ |
| सोयाबीन: ३२.५० क्विंटल | ४,६३० | ४,६३० | ४,६३० |
| हरभरा: ८.०० क्विंटल | ४,५०० | ५,९०० | ५,०४६ |

# अंबाजोगाई येथे १,१५० खाटांचे रुग्णालय उभारावे–अजित पवार

**मुंबई । प्रतिनिधी**

**मराठवाड्यातील ग्रामीण भागासाठी वैद्यकीय शिक्षण व आरोग्यसेवा अधिक सक्षम व्हावी, यासाठी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे १ हजार १५० खाटांचे सुसज्ज शासकीय रुग्णालय उभारण्यात यावे. तसेच स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचे काम दर्जेदार पद्धतीने करावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.**



स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाबाबत उपमुख्यमंत्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. या बैठकीस वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, वित्त विभागाच्या सचिव शैला ए, संचालक डॉ. अजय चंदनवाले, अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव राजेश देशमुख यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.देशातील पहिले ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय म्हणून ओळख असलेल्या अंबाजोगाईच्या ▶▶ पान २ वर

## वैष्णोदेवी मार्गावर दरड कोसळली; ५ ठार

**श्रीनगर । वृतसंस्था**

**जम्मू–कश्मीरातील त्रिकूट पर्वतावर स्थित माता वैष्णो देवी मंदिराला जाणाऱ्या मार्गावर मंगळवारी भूस्खलन होऊन दरड कोसळल्याने मोठा अपघात घडला आहे. अर्द्धकुंवारी स्थित इंद्रप्रस्थ भोजनालयाजवळ ही दरड कोसळल्याने यात पाच भाविकांचा मृत्यू झाला आहे. तर १४ भाविक जखमी झाले आहेत. घटनास्थळी रेस्क्यू ऑपरेशन सुरु आहे.**

ढीगाऱ्याच्या खाली आणखी काही भाविक अडकलेले असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. जम्मू–काश्मीरातील अनेक भागात सलग तीन दिवस मुसळधार पाऊस कोसळत असल्याने ही त्रिकूट पर्वतात ही दरड कोसळण्याची घटना घडली आहे.जम्मूच्या संभागमध्ये जोरदार पावसाने आतापर्यंत आठ जणांचे मृत्यू झाले ▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# अशा 'चोरवाटा' किती दिवस चोखाळणार?

मध्यप्रदेशात निवडणुकीत प्रचंड राजकीय लाभ मिळाला म्हणून महाराष्ट्र सरकारने जुलै २०२४ मध्ये सुरू केलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' ही महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या, आरोग्य आणि पोषण सुधारण्याच्या नावाखाली महायुतीला अनपेक्षित सत्ता बहाल करुन गेली. मध्यप्रदेश मुळातच बिमारु राज्य होते पण महाराष्ट्र अव्वल राज्य त्याच्या गतीवर परिणाम होईल याकडे सरकारने डोळेझाक केली आणि सहा महिन्यात महाराष्ट्राची दुर्दशा झाली. या योजनेअंतर्गत २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना दरमहा १,५०० रुपये (आणि पुढे २,१०० रुपये) देण्याचे उद्दिष्ट आहे. परंतु, २.५ कोटी अर्जांपैकी २.४ कोटी मंजूर असताना २६.३४ लाख बोगस लाभार्थी आढळल्याने सरकारच्या तब्बल ४ हजार ८०० कोटी रुपयांवर थेट दरोडा घातला गेला आहे. मनमोहन सिंग सरकारपासून मोदी सरकारपर्यंत सर्वात विश्वासार्ह मानलेली सरकारची डीबीटी थेट बँक खात्यावर रक्कम जमा करणारी आणि सर्व भ्रष्टाचारावरचा उपाय म्हटली गेलेली योजनाही या भ्रष्टाचारात कुचकामी ठरली. पुणे आणि ठाणे येथे सर्वाधिक बोगस लाभार्थी आढळले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यावर योजना बंद करण्याचा प्रश्न विचारला, परंतु ती बंद करण्याचा विचार नसल्याचे स्पष्ट केले. राज्याच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम करणारा हा अनुत्पादक खर्च आता उत्पादक कसा बनवायचा हे शासनाने ठरवले तर लोढण्याचे ओझे तरी वाटणार नाही. लाडकी बहीण योजनेसाठी ४३ ते ४६ हजार कोटी रुपये वार्षिक खर्च अपेक्षित आहे, जो राज्याच्या ८ लाख कोटींच्या कर्जाच्या पार्श्वभूमीवर मोठा आर्थिक भार आहे. २६.३४ लाख बोगस लाभार्थ्यांमध्ये १४,३०० पुरुष आणि अपात्र व्यक्तींचा समावेश आहे, ज्यामुळे सरकारी निधीचा अपव्यय झाला. योजनेच्या जाहिरातींवर २०० कोटी रुपये खर्च झाले आणि अपात्र लाभार्थ्यांना दिलेले पैसे यामुळे आर्थिक ताण वाढला आहे. बोगस अर्जांमुळे प्रशासकीय अकार्यक्षमता उघड झाली असून, यामुळे ऑनलाईन केवायसी तपासण्याच्या योजनेवरचा विश्वास उडाला आहे. आम आदमी पार्टीने याला 'निवडणूकपूर्व आर्थिक घोटाळा' संबोधले, तर काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी आचारसंहितेच्या काळात दिशाभूल केल्याचा आरोप केला. ही मतांसाठी दिलेली लाच होती असा आरोप यापूर्वी झाला होता तर सुप्रिया सुळे यांनी याविरुद्ध कोर्टात जाण्याचा इशारा दिला आहे. योजनेचा आर्थिक भार कमी करण्यासाठी अपात्र लाभार्थ्यांना भविष्यात लाभ न देण्याचा निर्णय घेतला गेला आहे, परंतु यामुळे ४८०० कोटींचे आर्थिक नुकसान भरून निघणार नाही. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला २३६ जागांसह मोठे यश मिळाले, तेच योजनेचे खरे आणि अपेक्षित यश होते. आता ही योजना सरकारच्या नरड्यात अडकलेले हाडुक ठरली आहे. तरीही, अजित पवार यांनी ती सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. कारण पुन्हा डोळ्यासमोर निवडणुका आहेत! योजनेचा दाखवायचा उद्देश ग्रामीण महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होता. प्रत्यक्ष बचत गट आणि खासगी पतपुरवठा कंपन्यांच्या कर्जाच्या विळख्यात ग्रामीण महिला आणि कुटुंबे अडकली आहेत. लखपती दिदी योजनेने बचत गटांचा फिरता निधी १५,००० वरून ३०,००० रुपये केला, परंतु कर्जाचा वाढता बोजा आणि आर्थिक अस्थिरता कायम आहे. खासगी पतपुरवठा कंपन्यांच्या उच्च व्याजदरांमुळे ग्रामीण महिलांना कर्ज भागवण्यासाठी जगण्याची, राबण्याची वेळ आली आहे. त्यावर रिझर्व्ह बँकेत जाऊन तक्रार करावी लागते. म्हणजे गरीब बायकांची सुटका नाहीच. लाडकी बहीण योजनेसारख्या रोख हस्तांतरण योजनांमुळे तात्कालिक आर्थिक दिलासा मिळत असला, तरी दीर्घकालीन सक्षमीकरणासाठी कृषी आणि औद्योगिक क्रांती आवश्यक आहे. शिवाय आज ही जी अनुत्पादक योजना आहे ती कष्टकरी महिला, शेत मजूर महिला, स्वयंरोजगार करणाऱ्या यांच्या रोजगारात महिन्याला सरकारी अधिकचे अनुदान देऊन त्याद्वारे १५०० ते २१०० रुपये देऊ केले तर त्यातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल. रोजगार देणाऱ्या शेतकरी, लघुउद्योग यांचा भार हलका होईल आणि रोजगार रक्कमही वाढीस लागेल. मनुष्य श्रमातून काही कार्यही घडेल. शहरातही मोलकरणी, बांधकाम कामगार, उद्योगातील महिला कामगार, सेवा पुरवठादार अशा वर्गाला लाभ दिला गेला तर मध्यमवर्गीय तसेच बांधकाम क्षेत्रालाही हातभार लागेल. अशाप्रकारे रोजगार देणाऱ्या सर्वच क्षेत्रात लाभ दिला तर खऱ्या लाभार्थींना त्याचा लाभ होईल आणि त्या त्या क्षेत्रालाही हातभार लागेल. ज्यामुळे राज्याची जीडीपी वाढीस लागेल. सध्याची योजना त्यामानाने वांझोटी आहे. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत कृषीचा वाटा १२ टक्के आहे आणि निम्म्याहून अधिक लोकसंख्या त्यावर अवलंबून आहे. अजित पवार यांनी जलयुक्त शिवार, मराठवाडा वॉटर ग्रीड आणि एआय तंत्रज्ञानासारख्या योजनांसाठी तरतूद केली आहे, परंतु लाडकी बहीणवरच अधिक खर्च होत आहे. त्याऐवजी कृषी सुधारणा, ग्रामीण उद्योगांचा विकास आणि महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे यामुळे दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य मिळू शकते. सध्याच्या धोरणांमुळे शाश्वत विकासाकडे दुर्लक्ष होते. यामुळे सरकारच्या प्राधान्यक्रमांवर प्रश्न उपस्थित होतात. केंद्राची उज्वला योजना अशीच गाजली आणि पुढे फसली. राज्य सरकारने जय भवानी, लाडकी लेक अशा योजनेचे स्वरूप बदलले. पूर्वी सुशीलकुमार शिंदे सरकारने मोफत वीज योजना गुंडाळली. मोदी सरकारने स्मार्ट सिटी, आदर्श संसद ग्राम योजना अशाच गुंडाळल्या. फडणवीस सरकारने किमान योजनेला उत्पादक करण्यास हरकत नसावी. दीर्घकालीन व्यवहार्यतेसाठी कठोर प्रशासकीय सुधारणा आवश्यक आहेत. या घोटाळ्याने रोख हस्तांतरण योजनेला देखील पंगू करून दाखवले आहे. ज्यामुळे देशातील अनेक योजनेत थेट भ्रष्टाचार शिरणार आहे. अशा 'चोर वाटा' आणि त्या वाटेवरच्या योजना दीर्घकाळ टिकणार नाहीत. शाश्वत विकासासाठी कधी ना कधी त्या योजना दुरुस्त कराव्या लागतील आणि वसुली देखील करावी लागेल. सरकारने अती उदार होणे व्यापक हिताचे नाही.

# अंभोरा पोलिसांनी १२ जुगारी पकडले

**आष्टी । प्रतिनिधी**

**अंभोरा पोलिसांनी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे धामणगाव येथील शेतातील जुगार अड्ड्यावर सापळा रचून सोमवारी धाड टाकत १२ जुगारी लोकांना रंगेहाथ पकडून त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाईल, दुचाकी,जुगीचे साहित्य असा आठ लाख ऐंशी हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करत आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये अंभोरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.**

सदरची कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी बाळकृष्ण हनपुडे याच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मंगेश साळवे,पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत तावरे,पोलीस हवालदार मुंकूद एकशिंगे,पोलीस अंमलदार शिवदास केदार, सतीश पैठणे,यांनी केली.पुढील तपास सहायक फौजदार सोपान येवले करीत आहे.अंभोरा पोलिसांनी धामणगांव येथे जुगार अड्ड्यावर धाड टाकून कारवाई केली.त्या कारवाईचे नागरिकातुन कौतुक होत असले तरी दादेगांव, दौलावडगाव, धानोरा, देवळाली, उंदरखेल यासह अन्य गावातील जुगार अड्ड्याचे काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.हॉटेल ढाब्यावरील देखील गोपनीय माहिती घेऊन कारवाई आवश्यक आहे.

# मांजराचे पाणी नियोजनबध्द शेतकऱ्यांपर्यंत पोहच करू-खा.सोनवणे

**बीड । प्रतिनिधी**

**शेतीसाठी पाणी आवश्यक असते. यावर्षी मांजरा धरण वेळेत पुर्णक्षमतेने भरले असून भविष्यात मांजरा धरणाचे पाणी नियोजनबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि परिसराच्या विकासासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन, असे प्रतिपादन खा.बजरंग सोनवणे यांनी केले.**



केज, अंबाजोगाई, धारूर, लातूर, कळंब या शहरासह ६१ गावांची तहान भागवणारे व मांजरा पट्ट्यातील पाच तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आणणारे केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरण १०० टक्के भरले आहे. दि.२६ रोजी सकाळी १० वाजता खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते जलपुजन करण्यात आले. जलपूजन प्रसंगी माजी आमदार पृथ्वीराज साठे, राजेसाहेब देशमुख, नरेंद्र काळे, प्रकल्प अधिकारी वर्ग, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, चेअरमन तसेच मोठ्या संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते.मांजरा धरण हे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आयुष्याशी, शेतीशी आणि उपजीविकेशी घट्ट जोडलेले महत्त्वाचे धरण आहे. या धरणामुळे परिसरातील हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते. दरवर्षी शेतकऱ्यांची पिकांची आशा या धरणाच्या पाण्यावरच अवलंबून असते. यंदा धरण पूर्ण क्षमतेने ऑगस्ट महिन्यातच भरल्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि दिलासा दिसून येत आहे. मांजरा धरणाचे पाणी नियोजनबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि परिसराच्या विकासासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन, असा विश्वास यावेळी व्यक्त केला. मांजरा धरणातून लातूर शहर, लातूर औद्योगिक वसाहत, केज, अंबाजोगाई, धारूर, कळंब या शहरासह ६१ गावे मांजरा धरणातील पाणी पुरवठ्यावर निर्भर असतात. मांजरा धरण पिण्याचे पाण्याबरोबर शेती पिकांना लागणाऱ्या पाण्यासाठी देखील महत्त्वपूर्ण आहे. धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्या अंतर्गत बीड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील ७३ गावातील १८ हजार २२३ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली येते. डावा कालवा ९० कि.मी. अंतराचा आहे. त्यातून १०,५५९ हेक्टर शेती तर, उजवा कालवा ७८ कि.मी.चा असून त्याअंतर्गत ७६६५ हेक्टर शेती सिंचनाखाली येते. खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामासाठी सरासरी १८५ दलघमी पाण्याचा वापर होते. याशिवाय केज व कळंब तालुक्यातील २७ गावातील शेतकऱ्यांना मांजरा धरणाच्या बॅकवॉटर पाण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ होतो, अशी माहिती यावेळी अधिकाऱ्यांनी उपस्थितांना दिली.

# पीएमश्री शाळा पाली येथे इको-फ्रेंडली गणेश मूर्ती स्पर्धा उत्साहात

**बीड । प्रतिनिधी**

**शहराजवळील पीएमश्री माध्यमिक शाळा, पाली येथे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबद्दल जनजागृती व्हावी या उद्देशाने इको-फ्रेंडली गणेश मूर्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा मुख्याध्यापक मु. अ. लाड सर व श्रीमती मनीषा जाधव मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी नैसर्गिक साहित्याचा वापर करून आकर्षक आणि पर्यावरणस्नेही गणपती मूर्ती साकारल्या. स्पर्धेद्वारे ''शाडू मातीचा वापर करा, निसर्ग वाचवा'' असा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.**




कार्यक्रमावेळी लाड सर व जाधव मॅडम यांनी पर्यावरणपूरक गणपती मूर्तीची गरज व उपयुक्तता स्पष्ट करत विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकातून मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीमुळे जलप्रदूषण वाढते, तर शाडू मातीच्या मूर्ती पाण्यात सहज विरघळतात व निसर्गासाठी सुरक्षित असतात. या उपक्रमाला शाळेतील शिक्षकवृंदांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी तळेकर सर, आघाव सर, राठोड सर, पायके सर, डोंगर सर, साळुंखे सर, काब्दे मॅडम, मुंडे मॅडम, म्हेत्रे मॅडम, हंगे मॅडम, सांगळे मॅडम, वाकचौरे मॅडम, खाडे मॅडम, मुळे मॅडम, जगताप मॅडम, सवई मॅडम, जाधव मॅडम व राठोड सर आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या कला कौशल्यासोबतच पर्यावरण संवर्धनाचे भान जपणारा हा उपक्रम सर्व स्तरातून कौतुकास पात्र ठरत आहे.

# सचिन लोखंडे यांना पितृशोक

**आष्टी । प्रतिनिधी**

कासारी मुर्शिदपूरचे माजी सरपंच मधुकर लोखंडे मामा अहिल्यानगर येथे उपचार यादरम्यान निधन आष्टी तालुक्यातील धामणगाव येथील मूळचे रहिवासी किती शहरात वास्तव्यात असलेले सरकार ग्रुपचे अध्यक्ष सचिन अण्णा लोखंडे यांचे वडील मधुकर सर्जेराव लोखंडे सेवानिवृत्त एसटी चालक यांचा आठ दिवसापूर्वी आष्टी शहरांमध्ये नगरपंचायत समोर अपघात झाला होता या अपघातामध्ये त्यांना जोराची धडक लागल्याने ते गंभीर जखमी झाले होते उपचारासाठी अहिल्यानगर येथील न्यू रोल प्लस एमआयडीसी रोड या हॉस्पिटलमध्ये उपचार घेत होते मात्र उपचार सुरू असताना शरीराने व जोराची धडक लागल्याने मधुकर लोखंडे मामा मज्जा तंतो सोज आली होती याचे निदान न झालेले



आज मंगळवारी ठीक ५ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली त्यांच्यावर आष्टी शहरातील बस स्थानक लागत स्मशानभूमी रात्री उशिरा अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी मोठ्या प्रमाणावर तीन लोखंडे यांचा मित्रपरिवार नातेवाईक व्यापारी डॉक्टर पुढारी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते मधुकर लोखंडे मामा यांच्या पश्चात दोन मुले सचिन व प्रदीप जुना नातवंडे असा त्यांचा हक्क करिता परिवार होता मधुकर लोखंडे यांच्या जाण्याने लोखंडे परिवारावर जे दुःखाचा डोंगर कोसळला आहे त्यामध्ये राज्य लोकतंत्र सहभागी आहे मधुकर लोखंडे मामा यांच्या मृत्यूची बातमी कळतात आमदार सुरेश आण्णा धस माजी आमदार साहेबराव दरेकर माजी आमदार भीमराव धोंडे बाळासाहेब आजबे यांनी हळहळ व्यक्त केली.

## पान १ वरून...

### बाप्पांच्या आगमनासोबत

पट्टा निर्माण झाल्यामुळे पुढील तीन ते चार दिवस राज्यासह देशात पावसाचा जोर वाढणार आहे. पावसामुळे आधीच शेतक-यांचे मोठे नुकसान झाले आहे, आता पुन्हा एकदा हवामान विभागाकडून पावसाचा इशारा देण्यात आला आहे. जोरदार पाऊस झाल्यास त्याचा मोठा फटका हा शेतक-यांना बसल्याची शक्यता आहे.

----------

### खंडोबा दीपमाळ मंदिर

त्यात पावसाचे पाणी मुरत आहे यामुळे या ऐतिहासिक वास्तूला इजा पोहचू शकते जर पुरातत्व खात्याने योग्यवेळीच याकडे लक्ष दिलं नाही तर या वास्तू इतिहास जमा व्हायला वेळ लागणार नाही या मंदिराचे विश्वस्त आणि स्थानिक नागरिक इतिहासप्रेमी मंदिरप्रेमींनी पुरातत्त्व खात्याकडे वारंवार तक्रारी दिल्या. तथापि, खात्याने केवळ उडवा-उडवीची उत्तरे देऊन वेळ मारून नेल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अतिक्रमणाविरोधात नोटिसा काढल्या गेल्याचे सांगण्यात आले असले तरी त्या नोटिसा प्रत्यक्ष कोणाला देण्यात आल्या याचा कोणताही रेकॉर्ड उपलब्ध नाही. अतिक्रमण धारक नोटीस स्वीकारण्यास नकार देतात, असे खाते सांगते; जर अतिक्रमण धारक नोटीस घेत नसतील पुरातत्व खातं कायदेशीर गोष्टींचा अवलंब करुन कारवाई का करत नाही, हा मोठा प्रश्न उपस्थित होत आहे.बीड जिल्ह्यात पुरातत्त्व खात्याचे स्वतंत्र कार्यालय नसल्याने शहरातील ऐतिहासिक वास्तूंना योग्य ती दखल मिळत नाही. परिणामी श्री खंडोबा दीपमाळ मंदिरासह अनेक वारशाच्या वास्तू दुर्लक्षित होत आहेत.

**अतिक्रमणावरील तातडीची कारवाई**

बीडमध्ये स्वतंत्र पुरातत्त्व कार्यालय स्थापन करावे.नागरिकांचे म्हणणे आहे की, प्रशासन व पुरातत्त्व खाते जर आत्ता तरी जागे झाले नाही, तर भविष्यात श्री खंडोबा दीपमाळ मंदिर अतिक्रमणामुळे नष्ट होणारी ऐतिहासिक वास्तू म्हणून ओळखले जाईल.

-रामनाथ गणपतराव खोड, सामाजिक कार्यकर्ता

-------------

### मुंबईला कूच करण्यापूर्वीच

त्यांची जी मागणी आहे त्याचा आज आढावा घेण्यात आला. सगेसोयऱ्यांबाबत असलेल्या मागणीवरही चर्चा करण्यात आली. बाकी वेगवेगळ्या कायद्याच्या प्रक्रिया सुरू आहेत. हैदराबाद गॅझेटियर आणि कुणबी नोंद शोधण्यासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या न्यायमूर्ती शिंदे समितीला मुदतवाढ देण्यात यावी, अशी मनोज जरांगे पाटील यांची मागणी होती. आम्ही आजच्या पहिल्याच बैठकीत या समितीला सहा महिने मुदतवाढ देऊन जरांगे पाटलांची मागणी मान्य केली आहे,'' असं विखे पाटील यांनी सांगितलं आहे.मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांबाबत पुढे बोलताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, ''मराठा आरक्षण लढ्यात मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबातील सदस्यांना सरकारी नोकरी देण्याची मागणी होती. यातील अनेक जणांना नोकरी देण्यात आली असून फक्त नऊ जणांना नोकरी देणं बाकी असून पुढील तीन महिन्यांत ती प्रक्रिया पूर्ण केली जाईल. तसंच सानुग्रह अनुदान देण्याचं काम पूर्ण झालेलं आहे,'' असा दावा त्यांनी केला आहे.दरम्यान, ''मराठा समाजाच्या मागण्यांसदर्भात आम्ही सर्वजण सकारात्मक आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तर मुख्यमंत्रपिदाच्या पहिल्या टर्ममध्ये मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र महाविकास आघाडीचं सरकार असताना कोर्टात ते आरक्षण टिकू शकलं नाही. पुन्हा महायुती सरकार आल्यानंतर आपण १० टक्के आरक्षण दिलं आणि ते सुप्रीम कोर्टात टिकूनही आहे. आरक्षणाच्या बाबतीत शासनाची कोणतीच भूमिका नकारात्मक नाही,'' असंही राधाकृष्ण विखे पाटील यावेळी म्हणाले.

----------

### जरांगेंना धक्का; आझाद मैदानात

चर्चाही केली. मात्र मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळाल्याशिवाय आता माघार घेणार नाही, अशी ठाम भूमिका या भेटीनंतर जरांगेंनी मांडली.आम्ही मुंबईला निघण्याआधी सरकारने आरक्षणाबाबत निर्णय घ्यावा, तरंच आम्ही माघार घेऊ, असं जरांगे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हटलं होतं. परंतु आता हायकोर्टानेच मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करण्यास मनाई केल्याने मनोज जरांगेंची कोंडी होणार आहे.

-------------

### प्रा.हाके यांच्यासह १४ जणांविरुद्ध

ठळला. दरम्यान, प्रा.लक्ष्मण हाके यांच्यासह दोन्ही गटातील १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, गेवराई शहरात शांतता आहे. मनोज जरांगे-पाटील यांच्या समर्थनार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या समर्थकांनी बॅनल लावल्याने, प्रा. हाके यांनी आमदार पंडित यांच्यावर टिका केली होती. त्यानंतर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी प्रा. हाके यांचा पुतळा जाळून निषेध केला. त्यामुळे, दोन्ही गट आमने सामने आले. मंगळवारी ता. २५ रोजी प्रा. हाके आणि आमदार पंडित यांच्या समर्थक एकमेकासमोर आले. जोरदार घोषणाबाजी झाली. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून, प्रा. हाके यांनी बायपास मार्गे बीडकडे जावे, अशी सूचना गेवराई पोलीस ठाण्याचे निरीक्षक बांगर यांनी केली होती. मात्र, गेवराई शहरातील शास्त्री चौकात चहा घेऊन जातो, अशी ताठर भूमिका घेतल्याने, दुपारी चार- पाचच्या दरम्यान दोन्ही गट, छत्रपती शिवाजी चौकात आमनेसामने आल्याने तणाव निर्माण झाला. घोषणाबाजी करीत कार्यकर्ते एकमेकांना आव्हान देऊ लागले. अचानक चप्पल, दगडफेक सुरू झाली. पोलीसांनी आक्रमक भूमिका घेऊन, सौम्य लाठीचार्ज केल्याने, मोठा अनर्थ ठळला. पोलीस ठाणे गेवराई येथे गोपनीय शाखेत कार्यरत असलेले पोलीस हवालदार रामराव आघाव यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, प्रा. हाके यांना कायदा व सुव्यवस्थेच्या कारणास्तव गेवराईत प्रवेश न करण्याची नोटीस बजावण्यात आली होती. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी सौम्य बळाचा वापर करत हाके व त्यांच्या कार्यकर्त्यांना सुरक्षितपणे बाहेर काढले. दगडफेकीत एक दोन दगड हाके यांच्या गाडीच्या दिशेने आले. पोलीसांनी व कार्यकर्त्यांनी हाके यांना सुरक्षित बाहेर काढले. या प्रकरणी प्रा. लक्ष्मण हाके यांच्यासह १४ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १८९(२), १९०, १९१(२), १९१(३), २८५, २२३, ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश कोटकर करत आहेत.

------------

### सोन्याचे दर वाढले

करतात. ज्यांच्या घरात गणपती बसतात ते गणपती बाप्पासाठी सोने खरेदी करतात. परंतु आता सोन्याचे भाव १ लाख २ हजारांपेक्षा जास्त झाले आहेत. त्यामुळे सोने खरेदी करावे की नाही असा प्रश्न विचारला जात आहे. सोन्याच्या दरात आज प्रति तोळ्यामागे ५५० रुपयांची वाढ झाली आहे. गणेशोत्सवाच्या आदल्या दिवशी सोन्याचे दर वाढल्याने पुढचे काही दिवस हे दर अजून वाढण्याची शक्यता आहे.

-----------

### स्व.बाबासाहेब आगेच्या पत्नीला

सोडणार नसल्याचे आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी सांगितले. निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समर्पण यांचा आदर्श असलेल्या स्व. बाबासाहेब आगे या उमद्या कार्यकर्त्याचा काही महिन्यांपूर्वी एका माथेफिरूने निर्घृण खून केला. या क्रूर घटनेने केवळ बीड जिल्हाच हादरला नाही, तर एका कुटुंबाचे आयुष्यच उद्ध्वस्त झाले. उघड्यावर पडलेलं कुटुंब सावरण्यासाठी त्याच्या पत्नीला बळ देणं गरजेचं होत. त्या भगिनीला डोंगराएवढ दुःख बाजूला सारून वृद्ध सासू सासरे व छोट्या मुलासाठी धैर्याने परिस्थितीशी सामना करण्याशिवाय पर्याय नव्हता. यासाठी स्वतःच्या पायावर उभा राहण्याची व कायमस्वरूपी नोकरीची गरज होती. भारतीय शिक्षण प्रसारक मंडळ ही सामाजिक भान असलेली संवेदनशील संस्था आहे. या सस्थेत पल्लवीताईला कायम स्वरुपी नोकरी मिळावी यासाठी संस्था चालकांकडे डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी वारंवार पाठपुरावा व विनंती केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनीही शब्द टाकला. भाशिप्र संस्थेने संघाच्या मुशीत घडलेल्या बाबासाहेब आगे याच्या परिवाराला योग्य न्याय दिला,त्याचे मानावे तेवढे आभार कमीच असल्याचे प्रतिपादन डॉ.शेटे यांनी केले.

**वृद्ध आईं व पत्नीला अश्रू अनावर**

आगे कुटुंबाने मुख्यमंत्री महोदयांच्या सागर निवासस्थानी देवेंद्र फडणवीस आणि भाजप अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची भेट घेतली. उभयतांनी त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केल्यानंतर स्व. बाबासाहेब आगे यांच्या मातोश्री राधाबाई आगे व पल्लवी आगे (सोळंके) यांना अश्रू अनावर झाले, त्यांच्या संयमाचा बांध फुटला. यावेळी उपस्थित सर्वांचे डोळे पाणावले. डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी हा योग जुळवून आणला त्याबद्दल त्यांचेही आगे कुटुंबाच्या नातेवाईकांनी आभार मानले.

------------

### आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला

आष्टी तालुका वकील संघ व नागरिकांनी पेढे वाटून आनंद साजरा केला. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे आष्टी तालुक्यातील जनतेला मोठा दिलासा मिळणार आहे.आतापर्यंत तालुक्यातील नागरिकांना बीडपर्यंत तब्बल ८२ किलोमीटरचा प्रवास करून न्यायालयीन कामकाज करावं लागत होते.आष्टीत न्यायालय उभारण्यात येत असल्यामुळे आता स्थानिकांचा वेळ,पैसा आणि श्रम वाचणार आहेत.तसेच या न्यायालयासाठी एकूण २५ पदांना मान्यता देण्यात आली आहे.सदर निर्णयामुळे आष्टी तालुक्यातील प्रलंबित प्रकरणांच्या निवारण प्रक्रियेला गती मिळणार आहे.या न्यायालयाच्या निर्णयाची मंत्रिमंडळाने घोषणा करताच आष्टी तालुका वकील संघ व नागरिकांनी पेढे वाटून आनंद साजरा करत आ.सुरेश धस व राज्य शासनाचे आभार संघाने मानले.

-----------

### वैष्णोदेवी मार्गावर

आहेत. यात पाच भाविकांचा समावेश असून ते माता वैष्णोदेवीच्या दर्शनाला आले होते. येथे २४ हून अधिक घरे आणि पुल क्षतिग्रस्त झाले होते.जम्मूमध्ये सर्व जलाशय धोक्याच्या पातळीपेक्षा जास्त वाहत आहेत. त्यामुळे शहरातील अनेक सखल भागात पाणी साचून जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी म्हटले आहे की जम्मू संभाग येथील काही ठिकाणची परिस्थिती बिकट झालेली आहे. आपण स्वत: स्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी श्रीनगरातून येणा-या विमानाने जम्मूला जाणार आहेत असे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांनी म्हटले आहे.

------------

### अंबाजोगाई येथे १,१५० खाटांचे

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचे रूपांतर आदर्श शासकीय संस्थेमध्ये करण्यात यावे असे उपमुख्यमंत्री पवार यांनी सांगितले. मराठवाडा विभागातील लोकसंख्येसाठी ही वैद्यकीय सुविधा म्हणजे एक मोठा दिलासा ठरणार आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी नवीन संधी मिळणार असून, ग्रामीण भागातील रुग्णांना तज्ज्ञ सेवांचा लाभ मिळणार आहे.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि. २७ ऑगस्ट २०२५



## थोडक्यात...

### जिल्हास्तरीय लोकशाही दिन २ सप्टेंबरला

बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार दि. १ सप्टेंबर रोजी जेष्ठ गौरीपुजन असल्याने मंगळवार दि. ०२ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे. अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी, अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती, दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळवले आहे.

### मादी खेकडे न पकडण्याचे नागरिकांना आवाहन

बीड । प्रतिनिधी

पावसाळयात निसर्गात उपलब्ध असलेल्या गोडया पाण्यातील खेकडयांची तस्करी होत असल्याची तक्रार आपले सरकार पोर्टलवरुन कार्यालयास प्राप्त झाली आहे. पावसाळयात नदी, नाले, तलाव यामध्ये नैसर्गिकरित्या गोडया पाण्यातील खेकड्यांचे प्रजनन सुरु होते. काही व्यक्ती प्रत्यक्षात या खेकडयांची तस्करी करीत असल्याने खेकडयांचे प्रजनन पूर्ण करु देत नाहीत. नैसर्गीक वास्तव्यास असलेल्या खेकडयांना प्रजनन हंगामात पकडणे हे कृत्य योग्य नाही. जर अशा पध्दतीने खेकड्यांना प्रजनन हंगामात पकडल्यास नैसर्गीकरित्या खेकडयांना प्रजनन करु न दिल्यास खेकडयाच्या प्रजाती नष्ठ होतील. त्यामुळे नदया, नाले, तलाव यामधील खेंकडयाची तस्करी होणे योग्य नाही. त्यानुषंगाने खेकडयांची तस्करी न होता खेकड्यांना प्रजनन नैसर्गीक पध्दतीने करु देण्याबाबत आपण सर्वांनी जागृत राहणे आवश्यक आहे. त्यामुळे निसर्गाचा समतोल राहील. खेकडयांच्या प्रजनन हंगामात निसर्गात उपलब्ध असलेले अंडी अथवा पिल्ले धारण केलेल्या त्याच प्रमाणे मादी खेकडे पकडण्यास बंदी घालणे आवश्यक असल्याचे मत्स्य व्यवसाय कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे नागरिकांना आवाहन केले आहे.

याबाबत अधिक माहितीसाठी मत्स्यव्यवसाय कार्यालय, पहिला मजला, दहीफळे इमारत, यशोदीप हॉटेलसमोर, बार्शी रोड, बीड -४३११२२ महाराष्ट्र फोन नंबर/फॅक्स (०२४४२) २२२७०९ मेल आयडी- -. पहिला मजला, दहिक शिदोरी कालावधी: -सी./फॅक्स: (०२४४२) २२२७०१ या क्रमांकावर किंवा वरील कार्यालयाच्या पत्यावर संपर्क साधावा.

### जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हयात कायदा व सुव्यस्थेबाबत आगामी काळात दि. २७ ऑगस्ट २०२५ रोजी श्रीगणेशोत्सव स्थापना दि.०६ सप्टेंबर २०२५ रोजी विसर्जन मिरवणूक, दि. ५ सप्टेंबर २०२५ रोजी ईद-ए मिलाद मिरवणुक असून तसेच राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे. दिनांक २६ ऑगस्ट २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. ०९ सप्टेंबर २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

# विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचे आदर्श शिक्षकाची भूमिका असावी -भीमराव धोंडे

आष्टी । प्रतिनिधी

**विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यात शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते.शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी सतत प्रयत्न करणे आवश्यक आहे. समाजात उच्च शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी स्वावलंबी जीवन जगत आहे.समाजात आदर्श शिक्षक निर्माण होणे आवश्यक आहे.शिक्षकांनी आदर्श जीवन जगून विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल बनवावे. विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचे आदर्श शिक्षकाची भूमिका असावी असे आवाहन संस्थाध्यक्ष माजी आ.भीमराव धोंडे यांनी केले.**



आष्टी येथील पंडित जवाहलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या नवीन इमारतीचे उदघाटनप्रसंगी माजी आ.भीमराव धोंडे बोलत होते. यावेळी गटशिक्षण अधिकारी सौ.सीमा काळे,केंद्रप्रमुख त्रिंबक दिंडे,सुरेश काळे, हरिभाऊ जंजीरे,उपसभापती पांडुरंग नागरगोजे,राजेंद्र धोंडे, अभय धोंडे,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे,सदाशिव दिंडे, हरि बोडखे,संजय सगळे,प्राचार्य डा.दत्तात्रय वाघ,प्राचार्य सुरेश बोडखे,प्रशासकीय अधिकारी डा.डी.बी.राऊत,उपप्राचार्य सुनील भवर,प्राचार्य डा. बाळासाहेब खेमगर,प्राचार्य डा.बनाळे,सागर वाघुले,संदीप नन्नवरे,इंजि.पी.बी.बोडखे,प्रा. हरिष चाऊस,पप्पु गोरे,शंकर धोंडे,शिवाजी टकले,पत्रकार अविशांत कुमकर,अक्षय विधाते,आण्णा साबळे,गणेश पोकळे आदी मान्यवर उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात माजी आ. भीमराव धोंडे म्हणाले की, आजपर्यत पं.नेहरु कनिष्ठ महाविद्यालयातुन१७ हजार विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडलेत. सर्व क्षेत्रात हे विद्यार्थी सक्सेक्स झालेले आहेत.आपण कृषी (क्राप सायन्स) हा विषय आणला होता म्हणून महाराष्ट्रातील सर्व अध्यापक विद्यालयात ( डी.एड.) कालेजात आपल्या विद्यार्थीना प्रवेश मिळाला.ते प्राथमिक शिक्षक झाले.असे हाजारो विद्यार्थी आहेत असे यावेळी भीमराव धोंडे यांनी सांगितले. या कार्यक्रमाच्या वेळी पंडित जवारलाल नेहरू उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपप्राचार्य सुनिल भवर आपल्या प्रास्ताविक भाषणात म्हणाले की,पंडित जवाहलाल नेहरू उच्च माध्यमिक विद्यालयाच्या इतिहासातील सुवर्ण अक्षरांनी लिहिलेला आजचा दिवस आहे.आज खऱ्या अर्थाने आम्हाला हक्काची जागा मिळालेली आहे याचा आम्हाला अभिमान आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने पंडित जवाहलाल नेहरू उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सुरेश बोडखे म्हणाले की,आज पंडित जवाहरलाल नेहरू उच्च माध्यमिक विद्यालयाची भव्य दिव्य इमारत पाहून आम्हाला खूप आनंद होत आहे.माजी आ.भीमराव धोंडे यांनी विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करून नवीन इमारत बांधून दिल्याबद्दल त्यांनी धोंडे साहेबांचे आभार मानले. सुत्रसंचन प्रा.झिंजुर्के सरयांनी तर आभार सुरेश फुले यांनी मानले.



## युसूफवडगांवच्या भुमिपुत्राचा कोल्हापूर मध्ये आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान


**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील युसुफवडगांव येथील अमोल मधुकर जोगदंड यांचा कोल्हापुर येथील राजर्षी शाहु फौंडेशन व वरदायीनी गृहतारण संस्थेच्या वतीने राजर्षी शाहु आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.**

युसूफवडगावचे भूमिपुत्र व गेल्या १७/१८ वर्षापासून कोल्हापुर जिल्ह्यात जि.प मध्ये शिक्षक म्हणुन कार्यरत असलेले शिवगर्जना फौंडेशनचे कार्याध्यक्ष व सह्यगिरी विचारमंचचे संचालक अमोल जोगदंड हे त्यांच्या सहकाऱ्यां सोबत मिळुन ते शिक्षण क्षेत्रात गरिब व गरजु विद्यार्थ्यांसाठी शालेय स्तरावर विविध शैक्षणिक उपक्रम राबवून या माध्यमातून आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व स्पर्धा परीक्षांचे मोफत मार्गदर्शन घेऊन हजारो विद्यार्थी घडवण्याचे काम करत आहेत. त्यांच्या याच कार्याची दखल घेत कोल्हापुर येथील राजर्षी शाहु महाराज व वरदायीनी गृहतारण संस्थेच्यावतीने शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्यांना दरवर्षी देण्यात येणारा राजर्षी शाहु आदर्श शिक्षक पुरस्कार त्यांना जाहीर करण्यात आला व काल कोल्हापुर येथे संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या भव्यदिव्य अश्या पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये त्यांना जि.प मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री.एस कार्तिकेयनसो यांच्या हस्ते अमोल मधुकर जोगदंड यांना राजर्षी शाहु आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला यावेळी त्यांचे कुटुंबीय व मित्र परिवार उपस्थित होते.त्यांना मिळालेल्या या आदर्श शिक्षक पुरस्काराने युसुफवडगांव व पर्यायाने बीड जिल्हाचे नाव नक्कीच उंचावले गेले आहे.त्यांच्या या यशाबद्दल गावकरी व मित्र परिवाराच्या वतीने त्यांचे कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

## सामान्य विज ग्राहकांची लुट; १५ सप्टेंबरला महावितरण कार्यालयाला चपलांचा हार - थावरे

माजलगाव । प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्यातील सामान्य घरगुती विज ग्राहकांवर अन्यायकारक अधिभार व वाढीव विज बिल लादून सरकार लुट करत असल्याचा आरोप शेतकरी नेते गंगा भीषण थावरे यांनी केला आहे. विज दरवाढीविरोधात त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत १५ सप्टेंबर रोजी लातूर येथील महावितरण कार्यालयाला चपलाचा हार घालण्याचा इशारा दिला आहे.

थावरे म्हणाले की, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून (महावितरण) आकारण्यात येणाऱ्या वीज देयकांमध्ये सामान्य ग्राहकांवर असह्य आर्थिक भार टाकण्यात येत आहे.थावरे म्हणाले की, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून (महावितरण) आकारण्यात येणाऱ्या वीज देयकांमध्ये सामान्य ग्राहकांवर असह्य आर्थिक भार टाकण्यात येत आहे. मासिक वापर केवळ ९६ युनिट असतानाही ग्राहकांना सुमारे ८५४ रुपये इतके बिल आकारले जात आहे. यामध्ये निव्वळ उर्जा शुल्क सुमारे ४०० रुपये असून उर्वरित रक्कम ही विविध कर, स्थिर आकार व अधिभारांमुळे वाढत असल्याचे ते म्हणाले.त्यांनी आरोप केला की, स्मार्ट मीटर योजना ही प्रत्यक्षात खासगी कंपन्यांच्या फायद्यासाठी राबवली जात आहे, आणि त्यामुळे ग्राहकांवर आणखी आर्थिक ओझं वाढणार आहे. या पार्श्वभूमीवर, विज दरवाढीविरोधात आंदोलनाची हाक देत त्यांनी सरकारला जाब विचारण्याचे आवाहन जनतेला केले आहे.

## मुंबई मोर्चामध्ये बहुसंख्येने उपस्थित रहा -नितीन वामन

म्हसोबावाडी । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील मौजे उदंरखेल गावातील उपसरपंच पदी नविन नियुक्ती झालेले नितिन वामन यांची उपसरपंच पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला व त्यांनी यावेळी संघर्ष योद्धा मनोज दादा जंरागे यांच्या सकल मराठा आरक्षणासाठी चलो मुंबई मोहिमेमध्ये सर्व राजकीय पक्ष किंवा हेवेदावे विसरून बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे या प्रसंगी उपस्थित उदंरखेल गावाचे उपसरपंच नितिन वामन, संदिप वामन, बाबासाहेब वामन,किशोर वामन, संतोष सानप सह आमच्या दैनिकचे पत्रकार प्रेम पवळ उपस्थित होते.

सर्वधर्मसमभाव जाती पलिकडे जाऊन संभाळला माणुसकीचा वारसा.. उदंरखेल गावचे विजय शेकडे यांनी जातीपातीला फाटा देत फक्त माणुसकीचा वसा जपत अन्नदान व पाणी बॉटल वाटप केली याबद्दल त्यांचे पंचक्रोशीतुन तोंड भरून कौतुक होतं आहे.

# आ. सुरेश धस यांच्या प्रयत्नामुळे पाणीदार विकासाला गती- अॅड चंपावती पानसंबळ

शिरूर । प्रतिनिधी





शिरूर तालुक्यातील सिंदफणानदी वरील ब्रम्हनाथ येळम व निमगाव मायंबा या कोल्हापुरी बंधाऱ्याची विस्तारीकरण व बॅरेज मध्ये रूपांतर करण्यासाठी आष्टी -पाटोदा- शिरूर तालुक्याचे भाग्यविधाते आ.सुरेश धस यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न केला होता. या प्रयत्नाला मंत्रिमंडळाने हिरवा कंदील दाखवून दिनांक २६ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीमध्ये मंजुरी देऊन गणेश उत्सवाच्या आगळ्यावेगळ्या शुभेच्छा दिल्या आहेत. आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नामुळेच दुष्काळजन्य असलेला शिरूर तालुक्यात आता पाणीदार विकासाची गती मिळू लागली असल्याचे माहिती अॅड. चंपावती पान संबळ यांनी दिली आहे.

आष्टी -पाटोदा -शिरूर विधानसभा मतदार संघामध्ये आमदार सुरेश धस हे विकासाचे सातत्यपूर्ण राजकारण करत आहे. यामुळे आमदार सुरेश धस यांची लोकप्रियता दिवसेंदिवस अधिकच खुलत चालली आहे. गेल्या काही वर्षापासून मतदार संघात विकासाची कामे रखडली होती. ही कामे आता आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नातून व मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मेहरबानी फास्टट्रॅकने होत असल्याचे पाहायला मिळत आहे. शिरूर तालुका हा दुष्काळजन्य तालुका म्हणून त्याची सर्वत्र ओळख आहे ही ओळख पुसण्यासाठी आ. सुरेश धस यांनी तालुक्यामध्ये सिंचनावरती भर दिला आहे. याचाच एक भाग म्हणून तालुक्यातून वाहणाऱ्या सिंदफणा नदी वरती ब्रम्हनाथ येळंब व निमगाव मायंबा येथील कोल्हापुरी बंधाऱ्याचे विस्तारीकरण व बॅरेज मध्ये रूपांतर करण्यासाठी केलेल्या प्रयत्नाला अखेर व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आधी आदरणीय मंत्रिमंडळांनी या कामाला मंजुरी दिली आहे. यामुळे सिंदफणा नदी मधून वाहून जाणारे पाणी आता तालुक्यातील शेतकऱ्यांना कामी येणार आहे. यामुळे आष्टी पाठोपाठ आता शिरूर तालुक्याच्या पाणीदार विकासाला गती मिळू लागली आहे.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/४७३
कार्यालय नगर परिषद अंबड
दिनांक ११/८/२०२५

नांव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार : उषा बळीराम कडुळे

प्रकरण : सर्वे नं.४०/१ प्लॉट नं.६०, सिटी सर्व्हे नं.१८६३/६० न.प.मि.न.-१८-८१-६० चे हस्तांतर करणेबाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प. मालमत्ता घर क. (१८-८१-६०) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला- इमारतीचे जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीती ज्याची चतुः सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा, नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतु:सिमा

पुर्व-याच प्लॉट मधील संमती देणारे बळीराम राधाकिसन कडुळे यांचा भाग

पश्चिम :-प्लॉट नंबर-६१

दक्षिण -प्लॉट नंबर - ७६

उत्तर - ९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता

**स्वाक्षरित/-**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

# वडवणी तालुक्याचे लाल बावटा बांधकाम कामगार संघटनेचे अधिवेशन मोठ्या उत्साहात संपन्न

वडवणी । प्रतिनिधी



बीड जिल्हा बांधकाम कामगार संघटना (लाल बावटा) ही बांधकाम कामगारांसाठी काम करणारी लढाऊ संघटना आहे. या संघटनेच वडवणी तालुक्यात चांगल्या प्रकारे काम आहे. या संघटनेचे पहिले वडवणी तालुका अधिवेशन देवडी येथे पार पडले.

या अधिवेशनाचे उद्घाटक व प्रमुख मार्गदर्शक म्हणून संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व बीड जिल्हाध्यक्ष कॉ.प्रा.बी.जी खाडे सर यांनी कामगार चळवळ त्याचा इतिहास व कामगार चळवळीतील लाल बावटा संघटनेच योगदान व कामगारांच्या वेगवेगळ्या प्रश्नांवर व प्रामुख्याने कामगार चळवळ व संघटना बांधनी आणि बांधकाम कामगारांना ९० दिवस कामच्या प्रमाणपत्र संदर्भात मार्गदर्शन केले. पुढे बोलताना त्यांनी कामगार मंडळाच्या कार्यालयीन दिरंगाई वर कठोर प्रहार केला.

या अधिवेशनाचे नियोजन जिल्हा उपाध्यक्ष कॉ.ओम पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. कॉ.ओम पुरी यांनी या अधिवेशनाची प्रस्तावना केली आणि मागील तीन वर्षांचा संघटनेचा कार्यात्मक अहवाल अधिवेशनासमोर ठेवला व तो गुणदोषसह एकमताने मंजूर करण्यात आला. या अधिवेशनात पुढील ठराव मंजूर करण्यात आले. बांधकाम कामगारांच्या पाल्यांच्या शिष्यवृत्ती मध्ये वाढ करावी., बांधकाम कामगारांच्या योजना सेवा हमी कायदा लागू करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी. प्रलंबित नोंदणी, नूतनीकरण, लाभाचे अर्ज तातडीने मंजूर करावी व त्यासाठी लढा मजबूत करावा , मागिल वर्षी ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र ग्रामपंचायत अधिकारी यांनी द्यावे. असे विविध ठराव एकमताने मंजूर करण्यात आले. या अधिवेशनामध्ये नवीन तालुका कमिटी व पदाधिकारी निवडीचा एकमताने करण्यात आली. यामध्ये वडवणी तालुका अध्यक्षपदी कॉ.ओम पुरी तर तालुका सचिवपदी कॉ.पप्पू आजबे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी श्री.गणेश चौधरी, उमेश काळे, सहसचिवपदी उत्तरेश्वर सवासे, विलास थोरात, कोषाध्यक्षपदी लक्ष्मण गिलबीले, तालुका कमिटी सदस्य म्हणून भागवत झाटे, नितीन भैरट, शरद फरताडे, सोनाजी गोंडे, रमेश मोरे, गोरख चांभारे, हरिदास गिरी, राजेभाऊ हातागळे, प्रविण शिंदे, अशोक साबळे, अंगद राठोड, करण अंडील,शहाजी ठोंबरे, अन्सार शेख, यशवंत अनभूले, व तीन जागा राखीव ठेवण्यात आल्या.

## पान ६ वरुन...

### व्यसनाचा शेवट विनाशाकडे

तर नुकसान होतेच होते शिवाय त्याच्या कुटुंबाचेही अतोनात नुकसान होते. आपला मुलगा काय करतो? काय नाही? याकडे पालकांनी लक्ष देणे गरजेचे आहे. तरुणांना उद्देशून बोलताना पुढे ते म्हणाले की मित्र जोडताना ते कसे आहेत? त्यांच्या सवय काय? त्यांना कोणते व्यसन आहे का? याचाही युवकांनी अभ्यास केला पाहिजे. वाईट मित्रांपेक्षा चांगले मित्र जोडा असे आवाहनही त्यांनी केले.याप्रसंगी माधवराव ताटे,डी .डी.जी.मस्के,मिलिंदराव घाडगे वैजनाथ गायकवाड, यांनी आपले विचार मांडले. तर नुकताच समाज भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल माधवराव ताटे यांचा तर महाराष्ट्र रत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल पत्रकार वैजनाथ गायकवाड यांचा सिद्धार्थनगर जयंती उत्सव कमिटीच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व मान्यवर पाहुण्यांचे हस्ते तथागत गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास विजय हजारे,कैलास तरकसे, सिद्धार्थ साळवे, अनिल सोनवणे, विकास गायकवाड,राम मुंडे, समाधान कांबळे,नंदू गायकवाड, किशोर बहादुरे,अशोक ढोकळे, अनिल कांबळे,आकाश गायकवाड, मंगेश मस्के,सनी तरकसे,बादल घाडगे, विशाल गायकवाड, भाऊराव ताल्डे,अजय पोटभरे, ओमकार कस्बे,आनंदराज साळवे,सुमित साळवे, अविनाश सुरवसे,अमोल सावंत, सुदर्शन कांबळे, अतुल मुंडे, तुळशीराम वैतागे, सनी चव्हाण, जितेंद्र जाधव,दिपक बहादुरे,मिलिंदराज साळवे,बाळा घाडगे आदि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मंत्रीमंडळ बैठकीत टाकळगाव

निविदा प्रक्रिया सुरू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सिंदफणा नदीवरील इतर सर्व बॅरेजची कामे सुद्धा लवकरच मंजुर होतील असा विश्वास आ. विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केला आहे.टाकळगाव बॅरेजमुळे परिसरातील शेकडो एकर जमीन ओलिताखाली येणार आहे. टाकळगाव, हिरापूर, पिंपळगाव कानडा, औरंगपूर कुक्कडा, कोपरा, दगडगाव, पारगाव जप्ती, हिंगणी हवेली, नांदुर हवेली यांसह परिसरातील गावांच्या सिंचनासाठी या बॅरेजचा फायदा होणार आहे. बीड आणि गेवराई तालुक्यातील सिंदफणा नदीकाठच्या गावांनाही त्याचा लाभ होईल. मंत्रीमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानंतर गेवराई विधानसभा मतदार संघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार व्यक्त केले. टाकळगाव व परिसरातील ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करून आ. विजयसिंह पंडित व अमरसिंह पंडित यांचे आभार मानले.सिंदफणा नदीपात्रात टाकळगाव येथे नवीन बॅरेजचे काम मंजुर झाल्याबद्दल टाकळगाव ग्राम पंचायतीचे सरपंच रुद्रा कदम व त्यांच्या सहकाऱ्यांनी गावात डफडे वाजवून साखर वाटप करत आनंद व्यक्त केला. त्यांनी जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित आणि आ विजयसिंह पंडित यांचे आभार मानले. ग्रामस्थ आणि शेतकरी यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयाचे स्वागत केले आहे.

### सुंदर चव्हाण यांची

जिल्ह्याच्या महत्वाच्या अशा उपजिल्हाध्यक्ष या पदावर विराजमान होण्याची संधी दिली. त्यांच्याच विचाराने त्यांचे चिरंजीव सुंदर चव्हाण यांनी नाथापुरचे सरपंच ते आज भाजपाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष या पदापर्यंत मजल मारली आहे.भाजपाचे बीड जिल्हाध्यक्ष श्री.शंकर देशमुख यांनी आपल्या स्वाक्षरीने उपरोक्त आदेश पारित केले आहेत.भाजपाने पुढील राजकीय गणिते विचारात घेऊन प्रत्येक तालुक्यामध्ये एक याप्रमाणे उपजिल्हाध्यक्ष निवड केलेली आहे.त्यामुळे गेवराई विधानसभा मतदार संघामध्ये श्री.सुंदर चव्हाण याची निवड करून सर्वसामान्य जनतेची सेवा करण्याची संधी त्यांना पक्षाने दिलेली आहे.याबद्दल त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे तसेच प्रितमताई मुंडे यांचे विशेष आभार मानून पक्षाने दिलेली जबाबदारी आपण यशस्वीरीत्या पेलणार असल्याचे सांगितले.बीड जिल्हाध्यक्ष श्री.शंकर देशमुख यांचेही आभार श्री.चव्हाण यांनी मानले.देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाला मजबूत बनवण्याचे कार्य आपण करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या या निवडीने गेवराई मतदार संघ आणि पिंपळनेर सर्कलमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत असून सर्व स्तरातून त्याच्या या निवडीचे स्वागत करण्यात येत आहे.

### घाटनांदुर येथील महावितरणच्या

मोर्चासह मागण्याचे नियोजन सामाजिक कार्यकर्ते पप्पू जाधव, पाराजी वैद्य, प्रदीप वैद्य यांनी केले व यावेळी गावकरी, मुर्तुजा शेख, श्याम गोदाम, संतोष गाडवे, दत्ता जाधव, श्रीकांत चव्हाण, राजकमल देशमुख, वागा काळे,आकाश शिंदे, हेमराज जाधव, वैजनाथ गाढवे, श्रीकिशन आरसुडे,संकेत जाधव, त्र्यंबक वैद्य,राजाभाऊ चाफकानाडे, महेंद्र गोदाम, विकास कदम,शरद जाधव, उत्तम शिंगाडे, बाबा होलबोले, विशाल जाधव, पिंटू गोदाम, संदीप गोदाम, जलील शेख, दयानंद लांडगे, गणेश जाधव, बबन सारडा,अमजत शेख,संतोष कोठुळे, पांडुरंग जाधव,श्रीमंत काटे, खंडू वैद्य, अविनाश इंगळे. संजय कुभार, व सामान्य गावकरी आपल्या हक्कासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते

-----------

# शेतकरी कर्जमाफीबाबत आम्ही ठाम, योग्य वेळ आल्यावर कर्जमाफी करणार : अजित पवार

आम्ही कधीच कर्जमाफीच्या घोषणपासून बाजूला गेलो नाही, आमच्या महायुतीच्या जाहीरनाम्यामध्ये कर्जमाफीच सांगितलं होतं, त्याबाबत आम्ही ठाम असल्याचे वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं आहे. एखादा निर्णय कर्जमाफीचा बाबत घ्यायचा असेल तर त्याची अंमलबजावणी करत असताना आर्थिक सगळ्या बाबी तपासाव्या लागणार आहेत. यासाठी आम्ही एक कमिटी नेमलेली आहे असे अजित पवार म्हणाले. ते साताऱ्यात बोलत होते. शेतकऱ्यांना आम्ही कर्जमाफी देणार नाही असं कधीच म्हणलेलो नाही. योग्य वेळ आल्यावर नेमलेली कमिटी त्यासंदर्भातील माहिती देईल यानंतर योग्य वेळ आल्यावर आम्ही कर्जमाफी करणार आहोत असे मतअजित पवार यांनी व्यक्त केले.

राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना फोन करून गणपती दर्शनाचं निमंत्रण दिलं आहे याबाबत अजित पवारांनी मिश्किल उत्तर दिले. एका भावाने एका भावाला फोन करून गणपतीला बोलावलं मी कसं बघतो मी तसं बघतो. एक भाऊ दुसऱ्या भावाच्या घरी गणेशोत्सवाला जाणार आहे काय बघतो कसं बघतो असं बघतो की कसं बघतो असे मिश्किल उत्तर अजित पवार यांनी दिलं आहे.





पेटा या संस्थेने केलेल्या कबुतरांच्या समर्थनार्थ केलेल्या जाहिरात बाजीबाबत बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोण काय म्हणतं यापेक्षा कायद्याने संविधानाने सर्वोच्च न्यायालय हे अंतिम आहे. जर आपलं काही वेगळं मत असेल तर ते न्यायालयासमोर मांडावं. सर्वोच्च न्यायालय त्याबाबतचा निर्णय देईल. मात्र सर्वोच्च न्यायालयाने त्याबाबतचा निर्णय दिलेला आहे आणि त्या पद्धतीने अंमलबजावणी करणं हे सरकारचं काम आहे.

चांद्यापासून बांध्यापर्यंत आपला पक्ष वाढवण्यासाठी प्रयत्न करुयात

चांद्यापासून बांध्यापर्यंत आपला पक्ष वाढवण्यासाठी प्रयत्न करुयात असे अजित पवार म्हणाले. २७ तारखेला गणरायांच आपल्याला स्वागत करायचं आहे. यशवंतराव चव्हाण यांच्यावर या जिल्ह्याने प्रेम केले आहे. आदरणीय पवार साहेबांना मनापासून साथ या जिल्ह्यानं दिली आहे. आपण आपल्या लोकांना सारखं नवीन तंत्रज्ञान सांगितलं पाहिजे असे अजित पवार म्हणआले. उगीच एकमेकांची उणी धुनी काढत बसण्यापेक्षा अशा क्षेत्रात लक्ष दिलं पाहिजे. साहेब जरी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष असले तरी चेअरमन चंद्रकांत दळवी यांना केले आहे. यात ४ लाख मुलं शिक्षण घेत असल्याचे अजित पवार म्हणाले.

**निवडणुकीत अपयश आल्यावर आता विरोधक रडीचा डाव खेळत आहेत :** दिन का भूक शाम की घर आये तो उसे भूल नही कहते अनिल देसाई पुन्हा घरी आलेत असे अजित पवार म्हणाले. निवडणूक डिसेंबरपर्यंत होण्याची दाट शक्यता आहे. प्रत्येकाने पक्ष वाढवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे असे अजित पवार महणाले. कोणत्याही परिस्थितीत एकट वाटून देऊ नका, पक्ष तुमच्या सोबत आहे. निवडणुकीत अपयश आल्यावर आता विरोधक रडीचा डाव खेळत आहेत. माणवासीयांच स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे अजित पवार म्हणाले.




### महत्वाच्या घटना

१३०३ : अल्लाउद्दीन खिलजीने चित्तोडगड जिंकले.
१४९८ : मायकेल अँजेलो याने 'पिएटा' या जगप्रसिद्ध शिल्पकृतीच्या कामास सुरूवात केली.
१७६८ : कॅप्टन जेम्स कूक एच. एम. एस. एन्डेव्हर या जहाजातुन आपल्या पहिल्या सफरीवर निघाला.
१७९१ : जॉन फिच यांना स्टीमबोट साठी अमेरिकेचे पेटंट देण्यात आले.
१८८३ : डच इंडीज (सध्याचे इंडोनेशिया) बेटावरील क्राकाटाऊ ज्वालामुखीच्या उद्रेकात १३५ गावे भस्मसात होऊन सुमारे ३६,००० लोकांचा बळी गेला.
१९२० : अमेरिकेतील महिलांना १९६५ च्या कायद्या अंतर्गत मतदान करण्याचा अधिकार मिळाला.
१९४४ : दुसरे महायुद्ध चार्ल्स द गॉलने पॅरिसमधे प्रवेश केला.
१९७२ : पश्चिम जर्मनीतील म्युनिच येथे २० व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९९४ : लोन टेनिसपटू रमेश कृष्णन आणि मध्यम पल्ल्याचा धावपटू बहादूर प्रसाद यांना के. के. बिर्ला फांउंडेशनचा पुरस्कार जाहीर
१९९६ : दक्षिण कोरियात १९७९ मध्ये झालेल्या लष्करी कटाबद्दल माजी अध्यक्ष चुन दू वान यांना मृत्यूदंडाची तर त्यांचे उत्तराधिकारी प्रो ताय वू यांना साडेबावीस वर्षे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.
२००२ : दक्षिण अफ्रिकेच्या जोहान्सबर्ग शहरांत दहा दिवसांच्या पृथ्वी शिखर परिषदेस प्रारंभ झाला.
२००८ : भारतीय तेलगु चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेता चिरंजीवी यांनी आपला नवीन पक्ष प्रजा राज्यम पक्षाची स्थापना करून आंध्र प्रदेश राज्यातील तिरुपती या ठिकाणी पहिली सभा घेतली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४० : हॉट एअर बलून चे शोधक जोसेफ-मायकेल मॉन्टगॉल्फ़र यांचा जन्म. (मृत्यू: ६ ऑक्टोबर १८१०)
१७४३ : ॲन्टॉइन लॅव्हाझिये फ्रेन्च रसायनशास्त्रज्ञ, आधुनिक रसायनशास्त्राचा जनक (मृत्यू: ८ मे १७९४)
१८९१ : भारतीय हिंदी साहित्याचे लेखक व कादंबरीकार आचार्य चतुरसेन शास्त्री यांचा जन्मदिन.
१९१० : मदर तेरेसा शांततेचा नोबल पुरस्कार तसचं, भारतीय सर्वोच्च नागीर पुरस्कार भारतरत्न सन्मानित अल्बेनियन-भारतीय रोमन कॅथोलिक धर्मगुरू व समाजसेविका (मृत्यू: ५ सप्टेंबर १९९७)
१९२२ : ग. प्र. प्रधान समाजवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक, शिक्षणतज्ञ, राजकारणी, लेखक, महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती. 'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभार', 'लोकमान्य टिळक', हाजी पीर', 'सोनार बांगला', 'भाकरी आणि स्वातंत्र्य' इ. मराठीतील पुस्तके प्रसिद्ध आहेत. (मृत्यू: २९ मे २०१०)
१९२७ : बी. व्ही. दोशी प्रख्यात वास्तुविशारद
१९२७ : भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ता, ज्येष्ठ काँग्रेस नेता, व हरियाणा राज्याचे माजी मुख्यमंत्री बंसीलाल यांचा जन्मदिन.
१९२८ : हिरो साइकिलचे सहसंस्थापक ओम प्रकाश मंजाल यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट २०१५)
१९४४ : अनिल अवचट लेखक व सामाजिक कार्यकर्ते
१९५६ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व देशाच्या प्रथम पंतप्रधान महिला इंदिरा गांधी यांचे दिवंगत पुत्र संजय गांधी यांच्या पत्नी मेनका गांधी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७२३ : अँथनी व्हॉन लीवेनहॉक डच सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ (जन्म: २४ आक्टोबर १६३२)
१९२७ : त्यांनी पॅरिस ते न्यूयॉर्क या ५,८०० किलोमीटरच्या विनाथांबा विमानोड्डाण स्पर्धेत भाग घेऊन साडे तेहतीस तासांत ती स्पर्धा जिंकली. वैमानिकी जीवनाच्या अनुभवांवरील त्यांच्या 'द स्पिरीट ऑफ सेंट लुईस' या पुस्तकास पुलित्झर पुरस्कार मिळाला. (जन्म: ४ फेब्रुवारी १९०२)
१९३४ : प्रसिद्ध भारतीय बंगाली संगीतकार, गीतकार आणि गायक, तसचं, महान कायदेपंडित, परोपकारी, समाजसेवक, शिक्षणतज्ञ आणि साहित्यिक अतुल प्रसाद सेन यांचे निधन.
१९४८ : कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ख्यातनाम महाराष्ट्रीयन मराठी साहित्यकार, लेखक, नाट्याचार्य, पत्रकार आणि लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांचे सहकारी व केसरी वृत्तपत्राचे संपादक व नवाकाळ वृत्तपत्राचे संस्थापक (जन्म: २५ नोव्हेंबर १८७२)
१९५५ : मुंबई मराठी साहित्य संघाचे संस्थापक अ. ना. भालेराव यांचे निधन.
१९५५ : मल्याळी चित्रपट अभिनेते बालन के. नायर यांचे निधन.
१९७४ : चार्ल्स ऑगस्टस लिंडबर्ग धाडसी अमेरिकन वैमानिक.
१९७५ : भारतीय स्वातंत्र्यसेनानी आणि काँग्रेस सेवा दलाचे संस्थापक व राजकारणी डॉ. नारायण सुब्बाराव हार्दिकर यांचे निधन.
१९९९ : नरेन्द्रनाथ डेव्हिस करंडक लॉन टेनिसपटू (जन्म:)
२०१२ : ए. के. हनगल पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय स्वातंत्र्यसेनानी, हिंदी चित्रपट व रंगमंच अभिनेते (जन्म: १ फेब्रुवारी १९१७)

## १०८ प्रकारचे विशेष बियाणे बाजारात!



नवी दिल्ली : अधिक उत्पन्न देणाऱ्या, बदलत्या हवामानास अधिक अनुकूल व बायो-फोर्टिफाइड १०९ बियाणांचे वाण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच देशाला अर्पण केले असून हे बियाणे कृषी आणि बागायती पिकांसाठी महत्त्वाचे आहे. या उपक्रमाचा उद्देश कृषी उत्पादकता आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे हा आहे. या जाती भारतीय कृषी संशोधन परिषदेने (आयसीएआर) विकसित केल्या आहेत आणि त्या एकूण ६१ पिकांच्या आहेत. त्यापैकी ३४ शेतातील पिके आणि २७ बागायती पिके आहेत. पंतप्रधानांनी शेतकरी, शास्त्रज्ञांशी यावेळी संवादही साधला.

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याणमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितले की, शेतकऱ्यांसाठी हा दिवस ऐतिहासिक आहे, कारण ६१ पिकांच्या १०९ जातींचे बियाणे जारी करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास, उत्पादनात वाढ आणि खर्च कमी होण्यास मदत होईल. ते म्हणाले की, या पिकांचे बियाणे हवामानास अनुकूल असून प्रतिकूल हवामानातही चांगले पीक देऊ शकतात. ते म्हणाले की, या जातींमध्ये भरपूर पोषकतत्त्वे आहेत. तृणधान्ये, बाजरी, चारा, तेलबिया, कडधान्ये, ऊस, कापूस आणि फायबर पिके यांचा लागवडीच्या पिकांमध्ये समावेश होतो.

बागायती पिकांमध्ये फळे, भाज्या, मसाले, फुले आणि औषधी वनस्पतींच्या नवीन जातींचा समावेश होतो. पंतप्रधानांनी 'जैव-फोर्टिफाइड' वाणांच्या संवर्धनावर सातत्याने भर दिला असून, कुपोषणाचा सामना करण्यासाठी माध्यान्ह भोजन योजना आणि अंगणवाडी सेवा यासारख्या सरकारी उपक्रमांशी जोडले आहे.

नवीन वाणाचा खर्च कमी

मोदींनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना सांगितले की, ६१ पिकांशी संबंधित हे नवीन वाण कमी खर्चात उपलब्ध होणार असल्याने अत्यंत फायदेशीर ठरणार आहे. यावेळी पंतप्रधानांनी बाजरीच्या महत्त्वावर चर्चा केली आणि लोक पौष्टिक आहाराकडे कसे वाटचाल करत आहेत यावर भर दिला. नैसर्गिक शेतीचे फायदे आणि सेंद्रिय शेतीकडे सर्वसामान्यांची वाढती आवड याबद्दलही पंतप्रधानांनी सांगितले. मोदी म्हणाले की, लोक सेंद्रिय पदार्थांकडे अधिक ओढले गेले असून सेंद्रिय पदार्थांची मागणी अधिक वाढली आहे.

## भाजीपाल्याचे अधिक उत्पादन मिळवण्यासाठी 'रिले क्रॉपिंग'

भाजीपाला लागवडीच्या वेगवेगळ्या पद्धतीद्वारे शेतकरी आपले उत्पन्न वाढवू शकतात. यातीलच एक पद्धती आहे रिले क्रॉपिंग. शेतकरी भाजीपाला पिकांचे चांगले उत्पादन मिळविण्यासाठी रिले क्रॉपिंग पद्धतीचा अवलंब करू शकतात. रिले क्रॉपिंग सिस्टीम हे एक तंत्र आहे ज्याद्वारे एकाच जमिनीवर वेगवेगळ्या भाज्यांची लागवड करता येते. हे एक खास शेती तंत्र आहे ज्याचा अवलंब करून शेतकरी अधिक उत्पादनासोबतच उत्पन्न वाढवू शकतात. विशेष म्हणजे यामध्ये मागील पीक काढण्यापूर्वी पुढील पीक पेरले जाते.

रिले क्रॉपिंग सिस्टम तंत्रज्ञान काय आहे?

रिले क्रॉपिंग सिस्टीम ही एक प्रणाली किंवा तंत्र आहे ज्यामध्ये एका शेतात एक पीक लावले जाते, तर मागील पिकातील उर्वरित ओलावा आणि पोषक तत्वांचा फायदा घेण्यासाठी त्याच शेतात दुसरे पीक नंतर लावले जाते. यामध्ये पहिले पीक काढण्यापूर्वी दुसरे पीक पेरले जाते. त्यामुळे पहिल्या पिकातील ओलावा दुसऱ्या पिकात जातो त्यामुळे सिंचनाची कमी गरज भासते, म्हणजेच कमी सिंचनात जास्त पिकांना या पद्धतीचा फायदा होऊ शकतो. जमीन आणि संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी आणि उत्पादन वाढवण्यासाठी ही प्रणाली उपयुक्त ठरू शकते.रिले क्रॉपिंग सिस्टम तंत्रज्ञानाचे फायदे : रिले क्रॉपिंग पद्धतीचा अवलंब केल्याने अनेक फायदे मिळतात जसे की, भाजीपाल्याचे बहुपिक घेतल्याने जास्त उत्पादन मिळते. बहुपीक शेतीमुळे शेतकऱ्याचे उत्पन्न वाढू शकते. या तंत्रज्ञानाचा अवलंब करून वर्षभर रोजगार मिळू शकतो म्हणजेच वर्षभर पैसा मिळवता येतो. मोठ्या प्रमाणात खताची आवश्यकता नसते. खताचा वापर संतुलित प्रमाणात केला जातो. पीक फेरपालटद्वारे जमिनीचे आरोग्य राखता येते. पाण्याच्या बचतीबरोबरच जमिनीची सुपीकताही राखता येते. या तंत्राने चांगले उत्पादन मिळू शकते, तथापि, पिकाचे चांगले उत्पादन हे जातीची निवड, योग्य पेरणीची पद्धत, संसाधनांचा योग्य वापर, कीड व्यवस्थापन, वेळेवर काढणी या गोष्टींवर अवलंबून असते.



या तंत्राने या भाज्यांची लागवड करता येते : काकडीसह मिरचीची लागवड - बहुपिक शेतीत काकडींसोबत मिरचीची लागवड करता येते. यामध्ये रिले क्रॉपिंग तंत्राचा वापर करून नोव्हेंबर ते मार्च आणि फेब्रुवारी ते ऑक्टोबर अशी दोनदा पेरणी केली जाते. मिरचीची पेरणी फेब्रुवारीमध्ये शेताच्या बांधावर केली जाते. मटारसह दुधीभोपळा लागवड - या तंत्रात नोव्हेंबर ते एप्रिल आणि फेब्रुवारी ते ऑक्टोबर या कालावधीत शेती केली जाते. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे हिवाळ्यात दुधीभोपळ्याची रोपवाटिका प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये तयार करावी आणि ती फेब्रुवारीमध्ये तयार केलेल्या बेडमध्ये २.५ मीटर ४५ सें.मी. अंतरावर दोन्ही बाजूला लागवड करावी. काकडी आणि घोसाळे लागवड - या तंत्राने नोव्हेंबर ते एप्रिल या कालावधीत काकडी आणि घोसाळ्याची लागवड केली जाते. याशिवाय मार्च ते ऑक्टोबर दरम्यानही लागवड करता येते. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की घोसाळ्याची पेरणी किंवा रोपण मार्चमध्ये ३ मीटर अंतरावर करावी. बटाटा-कांदा-हिरवळीचे खत लागवड - यांची लागवड सप्टेंबर ते डिसेंबर, डिसेंबर आणि जून-जुलैमध्ये करता येते.

कोणत्या पिकांची रिले क्रॉपिंग करू नये? अशी अनेक पिके आहेत ज्यांची एकत्र पेरणी करू नये कारण अशाच प्रकारच्या भाज्या कीटक किंवा रोगांना संवेदनशील असतात. ते एकत्र घेतल्याने पिकाचे कीड व रोगांमुळे नुकसान होण्याची शक्यता जास्त असते. उदाहरणार्थ, पीक पद्धतीमध्ये टोमॅटो आणि मिरची एकत्र पेरता कामा नये.

## पावसाळ्यात गाभण शेळ्याची कशी काळजी घ्यावी?

शेळीपालनाचे यश कळपामध्ये जन्माला येणाऱ्या करडांवर अवलंबून असते. त्यासाठी शेळी गाभण असणे आवश्यक आहे. दोन वर्षाला तीन वेळेस शेळी व्याली पाहिजे.

शेळीपालनाचे यश कळपामध्ये जन्माला येणाऱ्या करडांवर अवलंबून असते. त्यासाठी शेळी गाभण असणे आवश्यक आहे. दोन वर्षाला तीन वेळेस शेळी व्याली पाहिजे. शेळीपालन व्यवसायामध्ये संगोपनाला जितके महत्त्व आहे तितकेच महत्त्व गाभण शेळीच्या आरोग्य व व्यवस्थापनेला सुद्धा आहे. पावसाळ्यात गाभण शेळ्यांची विशेष काळजी घ्यावी लागते.

गाभण शेळ्यांचा आहार : चांगल्या वजनाची सशक्त करड जन्मण्यासाठी गाभण काळातच शेळीचे योग्य व्यवस्थापन करावे. गाभण शेळ्यांना वाळलेला ओला चारा, खुराक व खनिज मिश्रण यांचा पुरवठा योग्य प्रमाणात करणे आवश्यक आहे. गाभण शेळ्यांना सहज पचणारा चारा योग्य प्रमाणात पशुखाद्य द्यावा. गाभण काळातील शेवटचे किमान १ महिना व्यायच्या अगोदर समतोल आहाराचा पुरवठा करावा व गोठ्यातच फिरण्याची सोय असणे गरजेचे आहे. गाभणकाळात शेवटच्या ३-४ आठवड्यामध्ये गर्भाशयातील पिल्लांचा उत्तम वाढीसाठी उत्तम प्रतीचा चाऱ्याबरोबरच दररोज २५० ते ३५० ग्राम खुराक द्यावा. स्वच्छ पाणी द्यावे.



थंड पाणी किंवा पावसाचे पाणी देऊ नये त्यामुळे शेळीला सर्दी सारखे आजार होऊ शकतात. शक्यतो पावसाळ्यात गाभण शेळ्यांना सुका चारा द्यावा जसे कि भरडलेला मका, गहू सोयाबीन यांचे मिश्रण करून द्यावे.

गाभण शेळ्यांची लक्षणे : एक वेळ गाभण गेलेली शेळी पुढील २१ दिवसात परत माजावर येत नाही. तीन महिन्यांनंतर शेळीचे पोट वाढू लागते व तसेच शेळीचे वजन वाढलेले दिसून येते. शेळी गाभण झाल्यावर तिची त्वचा तजेलदार होते. शेळी गाभण आहे की नाही हे ओळखण्यासाठी नवीन पद्धतीमध्ये एक्सरे, सोनोग्राफी, लॅप्रोस्कोपी या तपासण्या खूपच विश्वसनीय मानल्या जातात. शेवटच्या गाभण काळात शेळीची कास मोठी होते.

गोठ्याचे व्यवस्थापण: गाभण शेळ्यांना इतरांपासून वेगळ्या जागी ठेवावे. सध्याचा हवामानात शेळ्यांचे पावसापासून तसेच आद्रतायुक्त हवेपासून बचाव करण्यासाठी गाभण शेळ्यांचा गोठ्यात उबदार वातावरण रहावे म्हणून साधारण २ ते ४ उंची पर्यंत १०० ते २०० पावरचे बल्ब लावावेत. रात्रीच्यावेळी गोठ्यात वाळलेले गवत, उसाचे पाचट अंथरावे जेणेकरून जमिनीतील गारवा व ओलसरपणा याचा गाभण शेळ्यांना त्रास होणार नही. गाभण असनाऱ्या शेळ्या बसण्याची जागा मलमुत्रामुळे ओली होते अशा ओलसर ठिकाणी आठवड्यातुन एक दोन वेळा चुन्याची भुकटी टाकावी. त्यामुळे गोठ्यात असलेले जीवाणू, विषाणू यांचा प्रादुर्भाव गाभण शेळ्यावर कमी होतो. पावसाळ्यात गाभण शेळ्यांना होणारे आजार व उपचार : गाभण शेळ्यांमध्ये पावसाळ्यात गर्भपात, अंग बाहेर येणे, पोटफुगी, आंत्रविषार, बुळकांडी, अपचन, अशा प्रकारचे आजार उद्भवतात. पावसाळ्यात आर्द्रतेचे प्रमाण जास्त असल्यामुळे शेळ्यांना श्वसनाचे आजार होण्याची दाट शक्यता असते. गोठ्यातील जमीन ओली असेल तर खुरांमध्ये ओलसरपणा राहून शेळ्यांचा खुरामध्ये जखमा होतात. पावसाळ्यात हिरवा ओला चारा जास्त प्रमाणात उपलब्ध असतो त्यामुळे गाभण शेळ्यांमध्ये अंग बाहेर येणे हा आजार मोठ्या प्रमाणात आढळून येतो असे असल्यास पशुवैद्याकाकडून योग्य उपचार करून घ्यावेत.

# संस्थाचालकांच्या मनमानी कारभार आर्थिक गैरव्यवहार

## कर्मचाऱ्यांवरील दडपशाहीविरुद्ध कारवाई करा

जालना । प्रतिनिधी

दोन संस्थाचालकांच्या जाचास कंटाळून श्रीनाथ गीते या तरूण आश्रमशाळा कर्मचाऱ्याची आत्महत्या अतिशय दुःखद आहे. शिक्षण क्षेत्रातील परिस्थिती चीड आणणारी व उद्विग्न करणारी असून महाराष्ट्रातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या आश्रमशाळा तसेच अनुदानित, विनाअनुदानित, अंशत: अनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळा संस्थाचालकांच्या मनमानी कारभार, आर्थिक गैरव्यवहार आणि कर्मचाऱ्यांवरील दडपशाहीविरुद्ध तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाने केली आहे. मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम यांनी दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात म्हटले आहे की, राज्यातील अनेक विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा,तसेच अनुदानित, विनाअनुदानित, अंशत: अनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळा संस्थाचालकांकडून आर्थिक गैरव्यवहार, मनमानी कारभार, कर्मचाऱ्यांवरील अन्यायकारक दडपशाही आणि शासननिधीचा अपहार मोठ्या प्रमाणावर होत आहे. या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालल्या असून त्याचा थेट परिणाम शिक्षककर्मचाऱ्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर आणि शैक्षणिक गुणवत्तेवर होत आहे. परिणामी शिक्षणाचा दर्जा खालावत असून विद्यार्थ्यांच्या भविष्यावर गंभीर परिणाम होत आहेत.

भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत प्रत्येक नागरिकास सन्मानाने जगण्याचा मूलभूत अधिकार आहे. मात्र अशा शाळांमधील संस्थाचालकांच्या दहशतीमुळे व अन्यायकारक कारभारामुळे हा अधिकार मोडीत निघत आहे. शासनाकडून समस्यांचे निराकरण करण्याऐवजी कर्मचारी नियमांच्या कचाट्यात अडकवले जात आहेत, जे संविधानाच्या कलम १४ अंतर्गत समानतेच्या तत्त्वालाही बाधक आहे. नुकतेच मा. विमुक्त जातीभटक्या जमाती राज्य समितीने सोलापूर जिल्ह्यातील आश्रमशाळांवर केलेल्या स्टिंग ऑपरेशनमध्ये शासननिधीवरील मोठ्या प्रमाणातील गैरव्यवहार उघड झाला आहे. हे प्रकरण संविधानाच्या कलम ४६ अंतर्गत दुर्बल घटकांच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधांच्या संवर्धनाच्या निर्देशक तत्त्वांचे स्पष्ट उल्लंघन आहे. या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील तरुण श्रीनाथ गीते याची आत्महत्या ही घटना राज्यातील हजारो कर्मचाऱ्यांच्या संघर्षाचं प्रतीक आहे. अनुकंपा नियुक्तीसाठी अनेक वर्षांपासून शासन व संस्थाचालकांच्या दारात धावपळ करूनही त्याला रुजू करून घेतले नाही. आईच्या कर्करोगाशी चाललेला संघर्ष, आर्थिक विवंचना आणि संस्थाचालकांच्या दडपशाहीमुळे अखेर त्याने आत्महत्या केली. ही शोकांतिका संविधानाच्या कलम २१ अंतर्गत जीवनाच्या अधिकाराचे गंभीर उल्लंघन आहे तसेच कलम ३९ (अ) मधील सामाजिक न्यायाच्या तत्त्वालाही बाधक आहे. त्यामुळे नियमांची पायमल्ली करणाऱ्या संबंधित संस्थाचालकांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावेत व त्यांची परवानगी/मान्यता रद्द करण्यात यावी. अशा शाळा आश्रमशाळांमध्ये शासननियुक्त प्रशासक नेमून शाळा कार्यान्वित ठेवाव्यात, जेणेकरून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये. राज्यातील सर्व वादग्रस्त शाळांची सखोल चौकशी करून अहवाल जाहीर करावा व दोषींवर कठोर कार्यवाही करावी. कर्मचाऱ्यांना गुलामासारखे वागवणाऱ्या मुजोर संस्थाचालकांची ''गुंडाराज पद्धती'' तातडीने संपुष्टात आणली जावी. सर्व अनुकंपा नियुक्त्यांसाठी वेळबद्ध प्रक्रिया आखून तिची काटेकोर अंमलबजावणी करावी. पीडित कर्मचाऱ्यांना तात्काळ संरक्षण, न्याय आणि मानसिक आधार उपलब्ध करून द्यावा. कोणत्याही महासत्तेचा मार्ग दर्जेदार शिक्षण व्यवस्थे मधूनच जातो. त्यामुळे श्रीनाथ गीतेंच्या आत्महत्येस जबाबदार असणारांवर कडक कारवाई करावी, शिक्षण व्यवस्थेतील अपप्रवृत्तींचा बंदोबस्त करावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव व सरचिटणीस राजकुमार कदम, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, कोषाध्यक्ष ए. बी. औताडे, सदस्य प्रेमदास राठोड, आरेफ कुरेशी,जिल्हाध्यक्ष रमेश आंधळे जिल्हा सचिव संजय येळवंते, कोषाध्यक्ष नारायण मुंडे,कार्याध्यक्ष फरकुंद अली सय्यद,उपाध्यक्ष भीमाशंकर शिंदे जगन वाघमोडे, सहसचिव गणेश चव्हाण,प्रद्युम्न काकड, दीपक शेरे,सोहम बोदवडे,ज्योती पांगारकर,शिरीन बेगम शहा,रमेश गाढे,गणेश मेहेत्रे, मार्गदर्शक डॉ मारुती तेगमपुरे, पुरुषोत्तम जुने,प्रा दत्ता देशमुख, प्रसिद्धी प्रमुख हकीम पटेल, भगवान धनगे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल मध्ये ६०० विद्यार्थांनी तयार केले मातीचे गणेश



बीड। प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक गणपती उत्सव साजरा करावा, त्यांच्यात पर्यावरण जागृती निर्माण व्हावी यासाठी तळेगाव, बीड येथील माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल च्या वतीने गणेश चतुर्थी च्या पूर्व संध्येला पर्यावरण पूरक मातीचे गणपती तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली. यामध्ये प्री प्रायमरी चे १५० आणि इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या ४५० अशा ६०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून गणपती तयार केले. माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल च्या वतीने दरवर्षी पर्यावरण पूरक गणेशमूर्ती तयार करण्यासाठी कार्यशाळा घेतली जाते. विद्यार्थ्यांनी स्वत: गणपती तयार करुन त्याची घरी स्थापना करावी व घरीच विसर्जन करुन असा यामागचा उद्देश आहे. संचालक ज्ञानेश्वर तांबे, नम्रता तांबे, मुख्याध्यापिका सारिका जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आशा गालफाडे यांनी या गणपती तयार करण्याचे प्रशिक्षण विद्यार्थांना दिले.

१५० पालकांनीही घेतला सहभाग माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल चे संचालक ज्ञानेश्वर तांबे यांच्या संकल्पनेतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी त्यांनी आयोजित केलेल्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांबरोबर १५० पालकांनीही सहभाग घेत त्यांनी मुलांबरोबर पर्यावरण पूरक गणेशमूर्ती तयार केल्या.

या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. ६०० विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतल्याने याला अधिक स्वरूप मिळाले. विद्यार्थ्यांनीही सुंदर गणेशमूर्ती तयार केल्या. स्वत: बनवलेल्या मूर्ती ची विद्यार्थी स्थापना करणार आहेत. शिवाय घरातच एका कुंडीत विसर्जन करणार असून त्या कुंडीत एक झाड लावणार आहेत. निर्माल्याचाही खत म्हणून उपयोग करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केल्याने पर्यावरण संवर्धनासाठी त्यांच्यामध्ये मोठी जनजागृती होईल.

असे संचालक ज्ञानेश्वर तांबे यांनी सांगितले. ७ वर्षापासून सातत्याने उपक्रम माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल च्या वतीने मागील ७ वर्षांपासून सातत्याने पर्यावरण संवर्धनासाठी कार्यशाळेचे आयोजन केले जाते. यंदा तब्बल ६०० विद्यार्थी पर्यावरण पूरक गणपती उत्सव साजरा करणार आहेत. पर्यावरण जागृतीचा संदेश यातून देण्यासाठी कार्यशाळा आयोजित केली होती. ती यशस्वी झाली असल्याचे मत सारिका जगताप, मुख्याध्यापिका यांनी व्यक्त केले.

## थोडक्यात

### अंतरवाली सराटी अन् वडीगोद्रीच्या वेशीवर पोलीस बंदोबस्त वाढवला

अंबड। प्रतिनिधी

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी मुंबईच्या दिशेने मोर्चा काढण्याची हाक दिल्यानंतर सरकारी पातळीवरील हालचालींना वेग आला आहे. मंगळवारी सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे ओएसडी राजेंद्र साबळे यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी भेट घेतली. यावेळी उभयतांमध्ये मराठा मोर्चाबाबत चर्चा झाली. मुख्यमंत्र्यांचे ओएसडी राजेंद्र साबळे यांनी गणेशोत्सवाच्या काळात मुंबईत मोर्चा काढू नये, अशी विनंती केली. मात्र, मनोज जरांगे यांनी सरकारने आम्हाला एक कोणताही मार्ग द्यावा. त्या मार्गाने आम्ही जाऊ, असे सांगत मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील मराठा मोर्चावर ठाम असल्याचे सांगितले. या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर आता पोलीस यंत्रणा सावध झाली आहे. बीड येथील जमाबंदीच्या आदेशानंतर अंतरवली सराटीच्या वेशीवर आणि वडीगोद्री येथे पोलिसांचा बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. सोमवारी संध्याकाळी गेवराई येथे ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके आणि आमदार विजयसिंह पंडित यांच्या समर्थकांमध्ये राडा झाला होता. यावेळी लक्ष्मण हाकेंच्या गाडीवर दगडफेकही झाली होती. याप्रकरणी पोलिसांनी १४ जणांवर गुन्हे दाखल केले होते. या पार्श्वभूमीवर मराठा आणि ओबीसी उपोषण आंदोलन झालेल्या ठिकाणी पोलिसांची अतिरिक्त कुमक तैनात करण्यात आली आहे. पोलिसांकडून कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून खबरदारी घेतली जात आहे. पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांच्या आदेशानंतर वडीगोद्री आणि अंतरवाली सराटीच्या वेशीवर आणि च्या प्रत्येकी दोन कंपन्या ,५ डी वाय एस पी, ८ पी आय सह २६६ अधिकारी कर्मचारी आणि १६५ होमगार्डचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

### अंतरवालीतून निघणार मावळ्याचा जथा

जालना : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी २९ ऑगस्टपासून मुंबईत उपोषण करण्याची घोषणा करणारे मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज अंतरवाली सराटी इथं पत्रकार परिषद घेऊन आंदोलनाची दिशा स्पष्ट केली आहे. ''अंतरवालीतून २७ ऑगस्ट रोजी निघाल्यानंतर छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, खेड, चाकण, पुणे मार्गे पुढे लोणावळा, वाशी आणि चेंबूरमार्गे मुंबईतील आझाद मैदानात पोहोचणार आहोत. अंतरवाली सराटी इथून निघाल्यानंतर पहिला मुक्काम किल्ले शिवनेरीवर होईल. तेथील माती कपाळी लावून दुसऱ्या दिवशी म्हणजेच २८ ऑगस्ट रोजी आपण शिवनेरीहून मुंबईला निघणार आणि २८ ऑगस्ट रोजी संध्याकाळी आपण मुंबईतील आझाद मैदान इथं पोहोचणार आहोत,'' असं जरांगे यांनी सांगितलं आहे.उपोषणाबाबत अधिक माहिती देताना मनोज जरांगे म्हणाले की, ''२९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजेपासून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आपले आमरण उपोषण सुरू होईल. आधी आपण कल्याणवरून जाण्याचा निर्णय घेतला होता. परंतु या मार्गात असणाऱ्या घाटाची आपल्या शिष्टमंडळाने पाहणी केली. घाटात मोठ्या प्रमाणात धुके असून १० फूट अंतरावरीलही काही दिसत नाही. त्यामुळे आपण वाशीमार्गे मुंबईत जाण्याचा निर्णय घेतला आहे,'' असं जरांगे पाटील यांनी स्पष्ट केलं आहे.

# रास्तभाव दुकानदारांचे प्रश्न मार्गी लावणार-आसाराम मोरे

मंठा। प्रतिनिधी

ऑल महाराष्ट्र फेअर प्राइज शॉपकीपर्स फेडरेशन पुणे या संघटनेशी सलग्न असलेल्या जालना जिल्हा रास्त भाव दुकानदार संघटनेच्या मंठा तालुकाध्यक्षपदी आसाराम मोरे यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेच्या माध्यमातून रास्त भाव दुकानदारांचे प्रश्न मार्गी लावणार असा विश्वास संघटनेचे नूतन मंठा तालुकाध्यक्ष आसाराम मोरे यांनी व्यक्त केला.



मंठा येथील शासकीय विश्रामगृहात जालना जिल्हा रास्त भाव दुकानदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष जगन्नाथ थोटे यांच्या अध्यक्षतेखाली मंठा तालुक्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानदारांची बैठक पार पडली. या बैठकीत संघटनेच्या मंठा तालुका अध्यक्षपदी आसाराम सोपानराव मोरे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष - दशरथ भागाजी बनसोडे, सचिव सुभाष शंकरराव गणगे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी भोकरदन येथील तालुकाध्यक्ष विश्वासराव गाढे वसंतराव पिंपळे, विलास साखरे, मुरलीधर खंदारे, मधुकर वायाळ, मिलिंद राठोड, आसाराम सखाराम मोरे यांची उपस्थिती होती. या निवडीनंतर रास्त भाव दुकानदार संघटनेचे नूतन तालुकाध्यक्ष आसाराम मोरे यांचा जिल्हाध्यक्ष जगन्नाथ थोटे यांनी सत्कार केला.

# दर्ग्याची विटंबना ; पोलिसांनी आरोपींना बेड्या ठोकल्याने वातावरण निवळले

अहिल्यानगर : शहरातील पटवर्धन चौक परिसरातील सय्यद घोडेपीर दर्गा या श्रद्धास्थानावर काही अज्ञात व्यक्तींनी तोडफोड केली होती. ज्यामुळे दोन गटांत तणाव निर्माण होण्याची स्थिती निर्माण झाली होती. यामुळे वातावरण आणखी चिघळू नये, म्हणून पोलिसांनी तातडीने कारवाई केली असून यातील आरोपीना बेड्या ठोकल्यानंतर शहरातील वातावरण निवळले.

वसिम रौफ खान यांनी कोतवाली या तोडफोडीसंदर्भात पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यावरून भारतीय न्याय संहितेच्या कलम २९८, २९९, ३२४ (४), ३ (५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी विशेष पथके तयार करण्याचे आदेश दिले आहेत. कोतवाली, तोफखाना पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे शाखा यांचे संयुक्त पथक प्रकरणाच्या तपासात गुंतले आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, तपासादरम्यान परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले आहेत. ज्यामध्ये तोडफोडीसाठी वापरलेले जेसीबी वाहन सापडले आहे. पोलिसांनी जेसीबी मालक अरुण गोविंद खरात यांची चौकशी केली असता वाहन बबलू पाल या चालकाकडे असल्याची माहिती पोलिसांनी मिळाली.

त्यानुसार पोलिसांनी बबलू पाल याला ताब्यात घेतले आहे. प्राथमिक चौकशीत त्याने काही साथीदारांसह ही घटना घडवून आणल्याची कबुली दिली आहे. त्यानंतर त्याचे साथीदार योगेश झोंड, सचिन दारकुंडे, दत्ता गायकवाड यांच्यासह आणखी तीन ते चार जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

# आधी पत्नीला संपवलं अन् स्वत:च्याही आयुष्याची दोर कापली

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील पारध बु. येथे मन हेलावणारी घटना उघडकीस आली आहे. कौटुंबिक वादातून पतीने पत्नीची निर्घृणपणे हत्या केली. नंतर स्वत:ही गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेने सारा परिसर हादरला आहे. पोलिसांनी घटनेचा तपास सुरु केला आहे.

समाधान अल्हाट (वय अंदाजे ३०) यांनी पत्नी कीर्ती (वय अंदाजे २५) यांचा पाच वर्षांपूर्वी झाला होता. दाम्पत्याला दोन वर्षांची मुलगी व पाच वर्षांचा मुलगा अशी दोन लहान अपत्ये आहेत. काही दिवसांपासून दाम्पत्यामध्ये भांडणं सुरू होती. कीर्ती काही दिवसांपूर्वी माहेरी वसई, ता.सिल्लोड येथे गेली होती. समाधान अल्हाट याने तिला पाच-सहा दिवसांपूर्वी जबरदस्तीने पुन्हा घरी आणल्याचे समजते. त्यांनी पत्नीचा जीव घेतला, तर स्वत:च्या आयुष्यचीही दोर कापली. मात्र हत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही समाधान किर्तीसोबत सतत वाद घालत होता. आज कीर्तीची आई दुपारी पारध येथे आले असता तिला हा सगळा प्रकार लक्षात आला आहे. या दुर्दैवी घटनेमुळे पारध परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, दोन बालकांचे भवितव्य अंधारात ढकलले गेल्याने चिंताही व्यक्त केली जात आहे.या घटनेची माहिती मिळताच पारध पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि पंचनामा केला. भोकरदनचे उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यांनी प्रकरणाच्या तपासाबाबत सूचना दिल्या.

# कारमध्ये कोयता घेऊन जाणाऱ्याला पकडलं

जालना। प्रतिनिधी

जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने तालुका जालना पोलीस ठाणे समोर मोटार वाहन कायदा अंतर्गत केलेल्या ई चलन केसेसचा प्रलंबीत दंड वसूल करणे व संशयोत वाहनाची तपासणी करणे यासाठी विशेष मोहिम राबविण्यात आली आहे. सदर विशेष मोहिम दरम्यान एक कार क्र. ४९ ६९५२ स्विफ्ट डिझायर यामध्ये लोखंडी कोयता तसेच गाडीमध्ये अनाधिकृत साचरत्त दिवा लावलेले आढळल्याने सदर कारचा चालक सुरेश काशीनाथ पुंगळे रा दरेगाव याचे विरुध्द कदिम जालना पोलीस ठाणे येथे पोहेकों/७७४ गणेश जाधव यांच्या फिर्यादीवरुन भारतीय हत्यार कायद्याच्या कलमाअन्वये गुन्हा दाखल केला आहे. तसेच सदर विशेष मोहिम दरम्यान मोटार वाहन कायदा ई चलन चा प्रलंबीत ३४५५० रु.दंड वसूल करण्यात आला आहे.



तसेच दिनांक २४/०८/२०२५ रोजी जिल्हा वाहतूक शाखेचे अंमलदार आष्टी पाथरी रोडवर मोटार वाहन कायदा केसेस करीत असतांना संशयास्पद इसम नामे सुखदेव लक्ष्मण सोनवणे वय १२ वर्षे रा.बनगाव ता. अंबड जि. जालना यास मोटार सायकलवर जातांना यांबवून विचारपुस केली असता त्याचे कडील तो चालवित असलेल्या मोटार सायकल क्र. २१ ८१४५ या नंबर व चेसीस इंजन नंबरची पडताळणी केली असता त्यात तफावत मिळून आल्याने व सदर मोटार सायकल चोरीची असल्याबाबत संशय निर्माण झाल्याने सदर इसमास मोटार सायकलसह पुढील कार्यवाहीकामी आष्टी पोलीस स्टेशन येथे रिपोर्टाने हजर केले आहे. सदरची कारवाई मा.श्री अजय कुमार बन्सल पोलीस अधीक्षक जालना, मा.श्री आयुष नोपाणी अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि श्री चंद्रकांत चातुरे, कृष्णा चव्हाण, गणेश जाधव संदिप बोंद्रे, विजय लोखंडे, महंमद चौधरी, राजेश दहिवाळ यांनी केली आहे.

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. /२०२५**
**मारुती पि. अंबादास इंगळे विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय कारेगव्हाण**

पहा

मारुती पि. अंबादास इंगळे रा. कारेगव्हाण ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत अंबादास शंकर इंगळे यांचा दिनांक १६/०५/१९९० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस कारेगव्हाण ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कारेगव्हाण ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक २६/०८/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २६/०९/२०२५ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २८९/२०२५**
**भारत पि.शामराव गायकवाड**
**ग्रामपंचायत कार्यालय नेकनूर**

पहा

१.भारत पि.शामराव गायकवाड रा. नेकनूर ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक आरती भारत गायकवाड यांचा दिनांक २२/०३/२०१९ रोजी जन्म झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस नेकनूर ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनूर ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक २६/०८/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २६/०९/२०२५ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

# जरांगे यांच्या आंदोलनमुळे रस्ता मार्गात बदल

## नियमाचे पालन करा : पोलीस अधीक्षक बंसल

जालना। प्रतिनिधी

मनोज जरांगे यांच्या आंदोलनामुळे कायदा सुव्यवस्था बाधित राखण्यासाठी.महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ कलम ३६ चे आदेशावरून रस्त्या मार्गाचं बदल करण्यात येत आहे. दिनांक २७:०८ २०२५ रोजी पोलीस ठाणे गोंदी हद्दीत मराठा आरक्षण अनुषंगाने आंदोलन यात्रेसाठी मराठवाडयातील काही मराठा समाज हा दिनांक २०/०८/२०२५ रोजी पासुन अंतरवाली सराटी या ठिकाणी जमणार आहे. त्यामुळे दिनांक २६.०८ २०२५ चे दिवसा मराठवाडयातील जालना जिल्हा वगळता इतर जिल्हयातील सुमारे १० ते १२ हजार लोक अंतरवालो सराटी या ठिकाणी जमणार असून सदर आंदोलन यात्रा ही दिनांक २७/०८/२०२५ रोजी १०.०० वा. मौजे अंतरवालो सराटो ते मुंबई जाणार आहे.

सदर यात्रेसाठी अंतरवाली सराटी येथे दिनांक २७/०८/२०२५ रोजी ४० ते ५० हजार मराठा आंदोलक जमण्याची शक्यता असुन ते सर्व आप. आपल्या वाहनासह हजर होतील तसेच त्यातून सुमारे १० ते १२ हजार लोक आंदोलन यात्रेत सर्व सामानासह यात्रासुरु करतील व उरलेली लोक त्यांना बळेगाव पर्यंत सोडण्यास येतील याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने सदर ठिकाणी मोठ्याप्रमाणात जनसमुदाय हजर राहणार आहे. सदर आंदोलन यात्रेच्या वेळी अडथळा निर्माण होवू नये, रस्ता मोकळा राहावा तसेच रस्यावर वाहणे उभी राहुन मार्गात अडथळा निर्माण होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये या दृष्टीने वाहतुकीचे नियमनासाठी या मार्गावरील वाहतुकीस पर्यायी मार्गाने वळविणे () कमप्राप्त आहे. त्याअधो महाराष्ट्र पोलीस अधिनीयम १९५१ चे कलम ३६ अन्वये मला प्रदान केलेल्या शक्ती नुसार मी, अजय कुमार बंसल, पोलीस अधिक्षक, खालील प्रमाणे जालना शहरातील वाहतुक नमुद पर्यायी मार्गाने वळविण्याचे आदेश पारीत करित आहोत. दिनांक २७/०८/२०२५ रोजी मराठा आंदोलन यात्रेच्या अनुषंगाने वाहतुकीमध्ये नियमांमध्ये बदल करण्यात येत आहे. पैठण फाटा शहागड ते पेठण पर्यायी मार्ग बीड गेवराई कडून येणारी पैठण फाटा शहागड मार्गे पैठणकडे जाणारी वाहणे हो शहागड पाचोड एनएच ५२ या महामार्गाने एकेरी वाहतुक जाईल-येईल आदेश दिनांक २७/०८/२०२५ मराठा आंदोलन यात्रा संपेपर्यंत अंमलात राहील. बरोल सदरचा आदेश मी अजय कुमार बंसल, पोलीस अधीक्षक जालना पोलीस प्रशासन यांच्यावतीने कळविण्यात येत आहे

**टीसी हरवला आहे**

परमेश्वर अर्जुन गवते या नावाचा दहावी पासचा टिसी बेलुरा-बीड या प्रवासादरम्यान हरवला आहे. कोणास सापडल्यास खालील नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क**
**९९७५८८९७३५**

# आ. सुरेश धस यांच्या भगीरथ प्रयत्नाने जलसंजीवनी

## सिंदफणा नदीवरील दोन बंधाऱ्याचा विस्तार व बॅरेजमध्ये रूपांतर करण्यास मंत्रिमंडळाची मंजुरी

**आष्टी /शिरूर कासार । प्रतिनिधी**

**शिरूर कासार तालुक्यातील सिंदफणा नदीवरील निमगाव मायंबा आणि ब्रम्हनाथ येळंब येथील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचा विस्तार करून त्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर करण्याच्या मागणीला अखेर शासनाने मान्यता दिली आहे. २६ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या महत्वाकांक्षी योजनेला हिरवा कंदील देण्यात आला असून या निर्णयामागे आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे.**

या निर्णयामुळे शेतकऱ्याच्या जीवनात जलसंजीवनी येणार असून आमदार सुरेश धस यांच्या भगीरथ प्रयत्नाने सिंदफणा नदीवरील दोन कोल्हापुरी बंधाऱ्यास बॅरेज मध्ये रूपांतर करण्यासाठी मंजुरी मिळाली असून आमदार सुरेश धस यांनी श्री गणरायाच्या आगमनाचे बळीराजाला एक गिफ्ट दिलं असल्याने आनंदो त्सव साजरा केला जात आहे.

यापूर्वी १ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या प्रकल्पाच्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली होती. त्यानंतर प्रशासकीय मान्यतेसाठी आमदार सुरेश धस यांनी राज्य शासनाच्या पातळीवर सातत्याने पाठपुरावा केला.



त्यांच्या या प्रयत्नांना यश मिळत मंत्रिमंडळ बैठकीत अंतिम निर्णय घेण्यात आला आहे. सिंदफणा ही नदी हंगामी वाहणारी नदी असल्यामुळे १५ ऑक्टोबर नंतर बऱ्याच वेळा प्रवाहित नसते त्यामुळे बंधाऱ्यात पाणीसाठा होत नाहीत तसेच मोठ्या संख्येने असलेल्या अर्ध्या मीटरचे दरवाजे बसवल्यानंतर ऑक्टोबर,नोव्हेंबर मध्ये अवकाळी पावसामुळे नदीला पूर आल्यास दरवाजे वेळेवर काढता न आल्याने पूर पातळी वाहून तीरावरील माती भराव वाहून जाऊन बंधाऱ्यांचे फार मोठे नुकसान होते. याबाबत आमदार सुरेश धस यांच्याकडे वेळोवेळी ग्रामस्थांनी मागणी केली असता या मागणीनुसार पर्यायी मार्ग म्हणून सदर कोल्हापुरी बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रूपांतर करावे अशी मागणी केली होती या मागणी ला आज मंत्रिमंडळात मान्यता मिळाली आहे. निमगाव मायंबा, ब्रह्मनाथ येळंब व आसपासच्या गावांचे शाश्वत पाण्यामुळे शेकडो हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येऊन सिंचन क्षेत्र वाढणार आहे.पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटेल तसेच भूजलपातळी उंचावून संपूर्ण परिसरातील पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होऊन दुष्काळी भाग जलयुक्त होणार आहे. त्यामुळे शेतकरी व नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे आमदार सुरेश धस यांनी सांगितले.या ऐतिहासिक निर्णयाबद्दल आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री मा.ना. देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री मा.ना. एकनाथरावजी शिंदे, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.अजितदादा पवार, जलसंपदा मंत्री मा.ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह भाजप महायुती सरकारमधील सर्व मंत्रीमंडळाचे आभार मानले आहेत.आष्टी मतदारसंघाचे भाग्यविधाते आमदार सुरेश धस यांचे निमगाव मायंबा,ब्रह्मनाथ येळंब व आसपासच्या गावाच्या ग्रामस्थांनी आनंद उत्सव साजरा करत आभार मानले आहेत.

# मराठा आरक्षणासाठी मोठ्या संख्येने मुंबईला चला-आ.संदीप क्षीरसागर

### वाढदिवस साजरा न करण्याचे आ.क्षीरसागरांकडून आवाहन

**बीड । प्रतिनिधी**



संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली, मराठा आरक्षणासाठी होत असलेल्या अंतिम आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर माझा वाढदिवस साजरा न करता आंदोलनात सहभागी होण्यासाठी मोठ्या संख्येने मुंबईला चला, याच माझ्यासाठी वाढदिवसाच्या शुभेच्छा असतील. असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

२७ ऑगस्ट रोजी आ.संदीप क्षीरसागर यांचा वाढदिवस आहे. त्यांचा वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम आणि कार्यक्रम घेऊन कार्यकर्ते वाढदिवस साजरा करत असतात. परंतु यावर्षी मराठा समाजाला आरक्षण मिळविण्यासाठीची ही शेवटची लढाई आहे. त्यामुळे माझा वाढदिवस साजरा न करता, सध्या संपूर्ण लक्ष आंदोलनावर ठेवून त्यासाठी जोमाने परिपूर्ण तयारी करा आणि संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली दि.२९ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबई येथे होत असलेल्या ऐतिहासिक आंदोलनास बहुसंख्येने, एकजूटीने मुंबईला चला. याच माझ्या वाढदिवसाच्या मला शुभेच्छा असतील. असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

# नगर परिषद गणेशोत्सव दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दणक्यात होणार साजरा

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील नगरपरिषद कर्मचारी मंडळाच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सव साजरा करण्यात येतो स्थापनेच्या आणि विसर्जनाच्या दिवशी खास आकर्षक मिरवणूक असा पायंडा असल्याने याही वर्षी गणेशोत्सव अगदी दणक्यात साजरा होणार असल्याची माहिती अध्यक्ष अक्षय धारक यांनी दिली.

माजलगाव नगरपरिषद गणेशोत्सवामध्ये विविध उपक्रमांची रेलचेल गणेशोत्सवा निमित्त असल्याने त्यासाठी सक्षम कार्यकारिणी देखील जाहीर करण्यात आली असून नगर परिषद गणेश मंडळ कार्यकरणी जाहीर उपाध्यक्ष विशाल अच्युतराव टाकणखार,सचिव विघ्नेश रत्नाकर मुंडे,कोषाध्यक्ष अनंत वाघमारे, सदस्य शिवहर शेटे, आयुब पठाण, विलेश कांबळे, संकेत साळवे, सागर उजगरे, सागर मिसाळ, फुने,दिवाळकर, मामडे,मुंडे,केंद्रे, गित्ते,महेश धर्माधिकारी, सुधाकर उजगरे, सखाराम हाके, वेदांत जोशी,सुमेध साळवे आदींचा समावेश आहे.

# उद्याच्या मुंबई मोर्च्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हा-मस्के, बागलाने, गोडसे

**बीड । प्रतिनिधी**

**मराठा संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे होत असलेल्या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन मराठा सेवक युवराज मस्के, अमोल बागलाने, संजय गोडसे यांनी केले आहे.**



मराठा संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली उद्या २७ ऑगस्ट रोजी अंतरवाली सराटी येथून मुंबईकडे निघणाऱ्या या मोर्च्या समाज बांधवानी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.गेल्या अनेक दशकापासून सुरु असलेले मराठा आरक्षण आंदोलन हे सध्या अंतिम टप्प्यात आले असून आरक्षणापासून वंचित असलेल्या समजबांधवाना लाभ मिळवून देण्यासाठी संपूर्ण समजाची ताकद संघर्ष योद्धे मनोजदादा जरांगे पाटील यांच्या पाठीशी उभी राहणे गरजेचे झाले आहे. गेल्यावेळेला मुंबईला जाऊन केलेल्या आंदोलनामुळे सरकारने सगेसोयऱ्याचा अध्यादेश काढला होता परंतु त्यांची अंमलबजावणी मात्र केली नाही. सरकारने दिलेले कोणतेच आश्वासन पाळले नाही मग ते हैद्राबाद गॅझेट, सातारा संस्थान, मुंबई गॅझेट आदी गोष्टींची दिलेली आश्वासन सरकारने पाळले नाही म्हणूनच आज पुन्हा एकदा मुंबईला धडक मारावी लागत आहे. मनोजदादाच्या या आरक्षण आंदोलनामुळे समाजाला एक नवसंजीवनी मिळालेली आहे. त्यांच्या संघर्षामुळेच आज अनेक कुटुंबाचा घटकात समावेश झाल्यामुळे अनेक समजतील अनेक मुलामुलींना शैक्षणिक व नोकरीं मध्ये लाभ झाला आहे. परंतु अजूनही अनेक गरीब मराठे या आरक्षणापासून वंचित आहे. तळागाळातील सर्व समजबांधवाना या आरक्षणाचा लाभ मिळवून देण्यासाठीच या आरक्षण आंदोलनात मोठ्या ताकदीने सहभागी व्हावे असे आवाहन मराठा सेवक युवराज मस्के, संजय गोडसे, अमोल बागलाने यांनी केले आहे.

# व्यसनाचा शेवट विनाशाकडे जातो- पो. नि.ढोणे

**परळी । प्रतिनिधी**

कोणत्याही व्यसनाचा शेवट हा विनाशाकडे जातो तसेच स्वतःबरोबर कुटुंबाचेही प्रचंड नुकसान होते. या संकटातून बाहेर येण्यासाठी तरुणांनी व्यसनमुक्त राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन संभाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे यांनी केले. ते परळीतील सिद्धार्थ नगर मध्ये आयोजित करण्यात आलेल्या व्यसनमुक्ती मार्गदर्शन शिबिरात बोलत होते.



सिद्धार्थ नगर येथील त्रिशरण बुद्ध विहारात दिनांक २५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटीच्या वतीने व्यसनमुक्ती मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ माधवराव ताटे हे होते. तर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, ज्येष्ठ मार्गदर्शक डी.जी.मस्के, पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड, पत्रकार वैजनाथ गायकवाड सामाजिक कार्यकर्ते संजय मस्के, संयोजक गौतम साळवे आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलतांना पो.नि.धनंजय ढोणे म्हणाले की, आजचा तरुण हा उद्याचा देशाचा आधारस्तंभ आहे. तो आधारस्तंभ डळमळीत असेल, व्यसनात गुंतलेला असेल तर स्वतःचे ◀◀ पान ३ वर

# धनंजय मुंडेंच्या नाथ प्रतिष्ठान कडून साध्या पद्धतीने होणार श्री वैद्यनाथ सार्वजनिक गणेशोत्सव साजरा

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

### ज्येष्ठ व्यापारी बंडू गरड यांच्या हस्ते सपत्नीक पूजन करून होणार होणार श्रींची स्थापना

### संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या संजीवन समाधी सोहळ्याचा जीवंत देखावा साकारणार; धनंजय मुंडे यांच्या हस्ते सायंकाळी ७ वाजता देखाव्याचे उद्घाटन होणार

माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने मागील वीस वर्षांपासून दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या श्री वैद्यनाथ सार्वजनिक गणेशोत्सवाचे यावर्षी शेतकरी बांधवांवर ओढवलेल्या संकटाच्या पार्श्र्भूमीवर अत्यंत साध्या पद्धतीने आयोजन करण्यात येणार असून, उद्या दुपारी १२.३० वाजता परळी वैद्यनाथ शहरातील ज्येष्ठ व्यापारी बंडू गरड यांच्या हस्ते सपत्नीक विधिवत पूजन करून मोंढा परिसरात उभारलेल्या मंडपात श्रींची विधिवत स्थापना करण्यात येणार आहे.

नाथ प्रतिष्ठान आयोजित श्री वैद्यनाथ गणेश महोत्सवास राष्ट्रीय पातळीवरील सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांची परंपरा आहे, मात्र यावर्षी संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या सप्त शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी संजीवन सोहळ्याच्या निमित्ताने संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या संजीवन समाधी सोहळ्याचा देखावा तसेच चांगदेव - मुक्ताई भेट, पैठण धर्मसभा असे अत्यंत आकर्षक देखावे साकारण्यात येत असून या देखाव्याचे माजी मंत्री आमदार तथा नाथ प्रतिष्ठान चे अध्यक्ष धनंजय मुंडे यांच्या हस्ते उद्या सायंकाळी ७ वाजता उद्घाटन करण्यात येणार आहे. श्री गणेश स्थापना तसेच देखावा उद्घाटन समारंभास राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नाथ प्रतिष्ठान चे सर्व सदस्य, तसेच श्री गणेश भक्तांनी उपस्थित राहावे, असे आवाहन नाथ प्रतिष्ठान च्या वतीने करण्यात आले आहे.

# पिंपळवंडी येथे गौरी गणपतीच्या खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी




**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

आज बुधवार रोजी श्री.गणेश स्थापना व दि.३१ रविवार रोजी ज्येष्ठा गौरी आगमन हे सण येत असून त्यासाठी पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील दगडे बंधूंच्या दुकानात गणेश मूर्ती व ज्येष्ठा गौरी व सजावटीचे साहित्य खरेदीसाठी ग्राहकांची मोठी झुंबड उडाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

दुकानात गणपतीच्या ६ इंच पासून ते ६ फुटापर्यंत उंची असलेल्या अनेक आकर्षक मूर्ती विक्रीसाठी ठेवलेल्या आहेत.घरगुती गणपती स्थापना व विविध गणेश मंडळाची ''मूर्ती'' खरेदीसाठी स्टॉलवर गर्दी दिसत आहे.यावर्षी उत्साहाचे वातावरण असल्याने गणेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरे होणार आहेत.दुकानात गणपती व ज्येष्ठा गौरी सजावटीसाठी मखरांसोबत इतर अनेक वस्तू उपलब्ध आहेत.झुंबर,रंगीबेरंगी पट्ट्या,फुलांचे हार-माळ,गणपतीच्या व ज्येष्ठा गौरीच्या मागे लावण्यासाठी चक्र तसेच ज्येष्ठा गौरीचे मुखवटे व कोथळ्याचाही समावेश आहे.

# सुंदर चव्हाण यांची भाजपा जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

**बीड । प्रतिनिधी**

भाजपा च्या जिल्हाध्यक्षाची निवड होऊन बऱ्याच दिवसानंतर पक्षश्रेष्ठींनी बीड जिल्ह्याच्या उर्वरित सर्व जिल्हा कार्यकारिणीची निवड जाहीर केली आहे.यामध्ये उप जिल्हाध्यक्ष,जिल्हा सरचिटणीस,जिल्हा कोषाध्यक्ष,जिल्हा सचिव या सर्व पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आलेली आहे.



यामध्ये नाथापूर येथील युवा नेतृत्व व गोरगरिबांच्या मदतीला सदैव तत्पर असलेले आणि पक्षासी एकनिष्ठतेने सोबत असलेले श्री.सुंदर मदनराव चव्हाण यांची भाजपा च्या गेवराई विधानसभा विभागासाठी उपजिल्हाध्यक्ष पदी निवड हि पक्षश्रेष्टीनी केली आहे,हे एका अर्थाने त्यांच्या पक्ष निष्ठेचे मिळालेले फळच आहे असे म्हणावे लागेल.भाजपाचे जि.प.सदस्य ते जिल्हा परिषदेचे गटनेते राहिलेले तसेच पिंपळनेर जिप गटात नेहमी आपले वर्चस्व अबाधित ठेवणारे मा.श्री.मदनराव चव्हाण यांनी नेहमी आपल्या पक्षाची साथ दिली.त्यांच्या याच कार्याची पक्षाने दखल घेऊन मुलास बीड ◀◀ पान ३ वर

# मराठा आरक्षणाच्या निर्णायक लढाईत मोठ्या संख्येने सहभागी व्हा - गणेश बजगुडे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

गेली अनेक वर्षांपासुनचा मराठा आरक्षणाचा लढा आज निर्णायक टप्प्यावर पोहचलेला असुन मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी लाखो मराठा बांधव मराठा आरक्षणाच्या या ऐतिहासिक लढाईत सहभागी होणार असुन आपण देखील मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन बीड तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष तथा शिवक्रांती युवा परिषदेचे संस्थापक गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे.



मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात मागील दोन वर्षांपासुन मराठा आरक्षणाची लढाई अधिक तीव्र झालेली असुन गेली चाळीस वर्षापासुनचा हा लढा आज शेवटच्या टप्प्यात असुन २९ ऑगस्ट रोजी लाखो मराठे राज्याच्या राजधानीत धडकणार असुन आरक्षण घेतल्याशिवाय आता मुंबई सोडायची नाही असा ठोस निर्णय करुन आता नाही तर कधीच नाही याप्रमाणे आपण सर्व मोठ्या ताकतीने या आरक्षणाच्या ऐतिहासिक लढाईचे साक्षीदार होऊया. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळेच अनेक मराठा बांधव आज ओबीसी प्रवर्गात आलेले आहेत. आपल्या कुणबी असल्याच्या नोंदी असुन देखील आपल्याला आरक्षणाचा लाभ मिळत नव्हता आज काही प्रमाण जरी मराठा समाजाच्या कुणबी नोंदी मिळालेल्या असल्या तरी ''सगे सोयरे'' व मराठवाडा गॅजेट ची अंमलबजावणी करुन मराठा कुणबी, कुणबी मराठा एकच असुन सर्व मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश करावा यासाठीची ही निर्णायक लढाई असुन सर्व मराठा बांधवांनी मोठ्या संख्येने या लढाईत सहभागी होण्याचे आवाहन शिवक्रांती युवा परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी केले आहे.

# घाटनांदुर येथील महावितरणच्या गलथान कारभारामुळे गावकऱ्यांच्या वतीने महावितरण कार्यालयावर हलकी मोर्चा

**घाटनांदुर । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेले घाटनांदुर या ठिकाणी विजपुरवठा सतत खंडित, लोडशेडिंग , वाढीव लाईट बिलची दुरुस्ती अशा अनेक प्रश्नामुळे घाटनांदुर येथील बाजारपेठेवर परिणाम झाला आहे घाटनांदुर हे गाव दहा ते पंधरा हजार लोकसंख्या असलेले गाव आहे या अनेक महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे गावकऱ्यांच्या अशा अनेक समस्या या आहेत मात्र स्थानिक नेते फक्त निवडणुकीपुरतेच नागरिकांना पहावयास दिसत आहेत पण



घाटनांदुर येथील सामान्य युवकांनी व गावकऱ्यांच्या वतीने महावितरण कार्यालय घाटनांदुर येथे २६ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता भगतसिंग चौक ते महावितरण कार्यालय येथे हलक्यासह धडक मोर्चाचे आयोजन ५ चा ट्रान्सफॉर्मर तात्काळ बसवणे, वाढीव लाईट तात्काळ घाटनांदुर येथे दुरुस्ती करण्यात यावी,घाटनांदुरचे गावठाण फिटर चे काम तात्काळ चालू करणे घाटनांदुर ते आनंदवाडी ते ३३ लाईनचे बोगस कामाची चौकशी करणे , लोडशेडिंग तात्काळ थांबवणे , पुरुष लाईनमॅन घ्यावा, लाईन मेन स्टाफ वाढवून देण्यात यावा, व घाटनांदुर या ठिकाणी कायमस्वरूपी इंजिनियर देण्यात यावा असे अनेक विविध मागण्यांचे निवेदन अंबाजोगाईचे उपकार्यकारी अभियंता सतीश कानडे यांना देण्यात आले या सर्व मागण्यांची माहिती घेऊन आठ दिवसात मार्गी लागतील असे आश्वासन देण्यात आले यावेळी या सर्व ◀◀ पान ३ वर

# मंत्रीमंडळ बैठकीत टाकळगाव बॅरेजच्या कामास मंजुरी

## आ. विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्याला यश

**गेवराई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकी दरम्यान सिंदफणा नदीवरील टाकळगाव कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याचे काम करू असा शब्द अमरसिंह पंडित यांनी दिला होता. त्यांनी दिलेला शब्द या माध्यमातून पाळला आहे. आमदार म्हणून निवडून आल्यानंतर विजयसिंह पंडित यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून मंत्रीमंडळ बैठकीत टाकळगाव बॅरेजच्या कामास मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे सिंदफणा काठावरील सिंचन क्षेत्रात भरीव वाढ



होणार असुन पालकमंत्री ना अजित दादा पवार यांच्या माध्यमातून या बॅरेज मंजुर होवू शकला असल्याची प्रतिक्रिया आ. विजयसिंह पंडित यांनी देवून त्यांनी महायुती सरकारचे त्यांनी आभार व्यक्त केले आहेत.

गेवराई सारख्या सततच्या दुष्काळग्रस्त तालुक्यात सिंचन सुविधा वाढाव्यात यासाठी जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी संधी मिळेल तेथे प्रयत्न केले. गोदावरी प्रमाणे सिंदफणा नदीपात्रात सुध्दा बारमाही पाणी असावे यासाठी त्यांनी शासन दरबारी पाठपुरावा केला. विधानसभा निवडणुकीत टाकळगाव को. प. बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतर करण्याचे आश्वासन आ. विजयसिंह पंडित यांच्या जाहिरनाम्यात देण्यात आले होते. आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नांमुळे याकामी मंगळवार, दि. १ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत टाकळगाव बॅरेजच्या कामास १९.६६ कोटी रुपये अंदाजित किंमतीसाठी राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. त्यानंतर पुढील आवश्यक कार्यवाही करून जलसंपदा विभागाने राज्य मंत्रिमंडळ बैठकीत सादर केलेल्या प्रस्तावानुसार मंगळवार दिनांक २६ ऑगस्ट रोजी टाकळगाव बॅरेजच्या कामास अंतिम मान्यता देण्यात आली आहे. या कामाच्या ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
बुधवार, दि.२७ ऑगस्ट २०२५ । पान ७

# अतिरिक्त आयुक्तांनी विसर्जन घाटांवरील सोयीसुविधांचा प्रभागनिहाय घेतला आढावा

## पिंपरी चिंचवड महापालिकेची गणेशोत्सवपूर्व तयारी वेगात

**पिंपरी । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी महापालिकेच्या ग, ड आणि ह प्रभागातील तर अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी अ, ब प्रभागातील महत्त्वाच्या गणेश विसर्जन घाटांची पाहणी करून आवश्यक सोयीसुविधांचा सखोल आढावा घेतला.

शहरात दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक गणेश विसर्जनासाठी घाटांवर येतात. यंदाही या उत्सवात मोठ्या संख्येने नागरिक सहभागी होण्याची शक्यता लक्षात घेता महापालिकेने विशेष तयारी केली आहे. त्याअंतर्गत विविध घाटांवरील सुविधा, स्वच्छता व सुरक्षा यांचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी अतिरिक्त आयुक्त खोराटे यांनी ग प्रभागातील सुभाषनगर घाट, पवनेश्वर घाट, महादेव मंदिर घाट, दत्त मंदिर घाट, ड प्रभागातील पुनावळे राम मंदिर शेजारील घाट, पिंपळे निलख येथील इंगवले पूल घाट, पिंपळे गुरव घाट तसेच ह प्रभागातील कासारवाडी स्मशानभूमी लगतचा विसर्जन घाट,



दापोडी येथील हॅरीस ब्रिज घाट आणि जुनी सांगवी येथील श्री. वेताळ महाराज घाट अशा विविध ठिकाणांना भेट दिली. तर, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी रावेत, चिंचवडगाव, निगडी, काळेवाडी या भागातील विसर्जन घाटांना भेट देत पाहणी केली.या पाहणीदरम्यान त्यांनी पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, कृत्रिम विसर्जन हौदांची स्थिती, प्रकाशयोजना, दिशादर्शक फलक, निर्माल्य कुंड, वाहतूक व्यवस्थापन, तसेच आपत्ती व्यवस्थापनाची पूर्वतयारीबाबत आढावा घेतला. सर्व विसर्जन घाटांवर स्वच्छतेसाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करावेत, निर्माल्य संकलनासाठी स्वतंत्र कुंड आणि वाहने उपलब्ध ठेवा, गर्दीच्या नियंत्रणासाठी सुरक्षा रक्षक व स्वयंसेवकांची पथके तैनात करा, आपत्कालीन परिस्थितीत त्वरित मदत मिळण्यासाठी मोफत वैद्यकीय मदत केंद्रे व ॲम्ब्युलन्सची व्यवस्था करा, तसेच वाहतूक व्यवस्थापन सुरळीत राहण्यासाठी योग्य नियोजन करा, असे निर्देशही त्यांनी संबंधित विभागांना दिले.या पाहणीवेळी महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. विसर्जन घाटांवरील सर्व सुविधा वेळेत उपलब्ध करून भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश दिले आहेत. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी निर्माल्य व प्लास्टिक कचऱ्याची स्वतंत्रपणे विल्हेवाट लावा. कृत्रिम विसर्जन हौदे व नदी घाटांची नियमित स्वच्छता करा, अशा सूचना आज पाहणी दरम्यान दिल्या आहेत.

– विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका


पिंपरी चिंचवड शहरातील सर्वच विसर्जन घाटांवर अधिक काटेकोर नियोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मूर्ती संकलनाची योग्य व्यवस्था करा. सर्व संबंधित विभागांनी नियोजित कालावधीत आवश्यक उपाययोजना पूर्ण करण्याच्या सूचना आज पाहणी दरम्यान दिल्या आहेत. – तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# गणेशोत्सवासाठी महापालिका सज्ज; मूर्तीदान, निर्माल्य संकलनावर भर

***पुणे । प्रतिनिधी***

शहराचा ऐतिहासिक वारसा आणि वैभवशाली गणेशोत्सव पुणेकरांच्या माध्यमातून यंदाही पर्यावरणपूरक साजरा व्हावा या उद्देशाने महापालिका प्रशासन सरसावले आहे. महापालिकेकडून शहरात गणेशोत्सवाच्या कालावधीत मूर्तीदान संकल्पनेवर भर देण्यात येणार असून, यंदाही निर्माल्य संकलनातून खतनिर्मिती केली जाणार आहे.

याशिवाय, न्यायालयाने ५ फुटांपेक्षा कमी आकाराच्या गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम हौदात करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यासाठी महापालिकेकडून यंदा या विसर्जनासाठी लोखंडी टाक्यांची संख्याही वाढविण्यात आल्याची माहिती महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम यांनी दिली.



२४१ ठिकाणी मूर्तीसंकलन केंद्र

गेल्या काही वर्षांत महापालिकेकडून पुणेकरांना पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले जात आहे. त्याला चांगला प्रतिसाद मिळत असून, गणेशोत्सवाच्या कालावधीत मूर्तीदानाचे प्रमाण वाढले आहे. मागील वर्षी (२०२४-२५) शहरात १ लाख ७६ हजार ६७ मूर्तीदान करून या मूर्ती महापालिकेकडे देण्यात आल्या होत्या. हे वाढलेले प्रमाण पाहता महापालिकेकडून यंदा २४१ ठिकाणी मूर्तीदान केंद्र उभारण्यात येणार आहे.

तर गणेशमूर्ती विसर्जनासाठी संपूर्ण शहरात १५ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत ३८ ठिकाणी नदीकाठच्या परिसरात बांधलेले विसर्जन हौद, २८१ ठिकाणी ६४८ लोखंडी टाक्या मूर्ती विसर्जनासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच, नदीकाठचे विसर्जन हौद आणि लोखंडी टाक्या असलेल्या ठिकाणी ३२८ निर्माल्य संकलन कंटेनर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मागील वर्षी शहरात महापालिकेकडून ७०६ टन निर्माल्य संकलन करून त्यापासून पाषाण तलावाच्या परिसरात सेंद्रिय खत तयार करण्यात आले होते.

शाडूमातीचेही संकलन करणार

महापालिकेकडून मागील काही वर्षांपासून स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून पुनर्वापर प्रकल्प राबविण्यात येत आहे. शाडूमाती ही मर्यादित संसाधन असल्याने तिच्या उत्खननामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होतो. ही बाब लक्षात घेऊन या मातीचा पुनर्वापर केला जाणार आहे. त्यासाठी ४६ ठिकाणी शाडूमाती संकलन केंद्रेही महापालिकेकडून यंदा उभारण्यात येणार आहे. या ठिकाणी संकलित झालेल्या मूर्ती तसेच माती मूर्तीकारांना परत देण्यात येणार आहे. त्यासाठी विसर्जन घाटांवर स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून जनजागृती केली जाणार आहे.

असे आहे पालिकेचे नियोजन

नदीकाठचे बांधकाम केलेले विसर्जन हौद – ३८
विसर्जनासाठी २८१ ठिकाणी सुविधा
विसर्जनासाठी ६४८ लोखंडी टाक्या
मूर्ती संकलन केंद्रे – २४१
निर्माल्य कलश – ३२८
शाडूमाती संकलन केंद्रे – ४६

# आसावरी जगदाळेंचा सरकारी नोकरीचा मार्ग मोकळा; पुणे महापालिकेने राज्य सरकारला प्रस्ताव केला सादर!

**पुणे । प्रतिनिधी**

देशाला हादरवून सोडणाऱ्या काश्मीर येथील पहलगाममधील हल्ल्यात दहशतवाद्यांनी २६ भारतीयांना ठार केले. या हल्ल्याचा बदला म्हणून भारताने पाकिस्तानाला जशाच तसे जोख प्रत्युत्तरही दिले. यासाठी भारताने ऑपरेशन सिंदूर ही मोहीम राबविली होती.



या दहशतवादी हल्ल्यात पुण्यातील मृत्युमुखी पडलेल्या संतोष एकनाथ जगदाळे यांची कन्या आसावरी यांचा पुणे महापालिकेने नोकरीसाठीचा प्रस्ताव राज्य सरकारला सादर केला आहे. त्यानुसार असावरी यांना पुणे महापालिकेने वर्ग दोन आणि वर्ग तीनमधील चार पदांपैकी एका ठिकाणी नोकरीचा मार्ग मोकळा झाला आहे. आता या प्रस्तावाला राज्य सरकारने मान्यता दिल्यानंतर आसावरी जगदाळे यांना महापालिकेत सरकारी नोकरी मिळणार आहे. पुणे महापालिकेचे आयुक्त नवलकिशोर राम यांना हा प्रस्ताव नगरविकास कार्यासन अधिकारी यांच्याकडे पाठविला आहे. आसावरी जगदाळे यांनी महापालिकेकडे त्यांच्या शिक्षणाची माहिती सादर केली आहे. त्यानुसार त्यांना प्रशासन अधिकारी (वर्ग-२), उप अधिक्षक (वर्ग-३), संगणक ऑपरेटर (वर्ग-३) आणि लिपिक टंकलेखक (वर्ग-३) या चार पदांपैकी कुठल्याही पदावर त्यांची नियुक्ती करणे शक्य असल्याचा अहवाल प्रशासनाने राज्य सरकारला पाठवला आहे.

नोकरीसाठी केली होती शिफारस

आसावरी जगदाळे यांनी विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून शासकीय सेवेत सामावून घ्यावे, अशी शिफारस पत्राद्वारे केली होती. आसावरी यांनी पुणे विद्यापीठातून DLL/LW (Labour Law and Labour Welfare) पदवी घेतली आहे. तर त्यांनी चइ- (Human Resources Management) हे शिक्षण भारती विद्यापीठ येथून पूर्ण केले आहे. तसेच इडल (Computer Science) पदवीही त्यांनी संपादित केली आहे.

# पुणे विद्यापीठाचा सेट परीक्षेचा निकाल ३० ऑगस्टपर्यंत जाहीर होणार



**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने १५ जून २०२५ रोजी घेतलेल्या चाळीसाव्या सेट परीक्षेचा निकाल ३० ऑगस्टपर्यंत जाहीर करण्याचे लेखी आश्वासन विद्यापीठाने दिले आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या आंदोलनानंतर विद्यापीठ प्रशासनाने ही घोषणा केली.

दोन महिन्यांहून अधिक काळ निकाल रखडल्याने ९०,००० हून अधिक उमेदवारांच्या शैक्षणिक भवितव्यासमोर अनिश्चितता निर्माण झाली होती. सहायक प्राध्यापक होण्यासाठी आवश्यक असलेल्या या परीक्षेच्या निकालाच्या प्रतीक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या मागणीसाठी अभाविपने आज विद्यापीठाच्या सेट परीक्षा भवनसमोर आंदोलन केले. आंदोलनादरम्यान विद्यापीठाच्या कुलसचिव प्रा. डॉ. ज्योती भाकरे आणि सेट परीक्षा संचालक प्रा. कापडणीस यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्या ऐकून घेतल्या. अखेर विद्यापीठाने ३० ऑगस्ट २०२५ पर्यंत निकाल जाहीर करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे.

# पुण्यात टिव्हीएस सर्व्हिस सेंटरला भीषण आग; ६० दुचाकी खाक

**पुणे । प्रतिनिधी**

बंडगार्डन रस्त्यावरील ताराबाग येथील तीन मजली इमारतीच्या तळमजल्यावर असलेल्या टिव्हीएस कंपनीच्या शोरूम व सर्व्हिस सेंटरमध्ये सोमवारी (२५ ऑगस्ट) रात्री भीषण आग लागून तब्बल ६० दुचाकी जळून खाक झाल्या. रात्री ८.३८ वाजता आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळताच नायडू व येरवडा केंद्रातील अग्निशामक दलाची वाहने तसेच मुख्यालयाचा वॉटर टँकर तातडीने घटनास्थळी दाखल झाला.

घटनास्थळी पोहोचल्यावर तळमजल्यावरील सर्व्हिस सेंटरमध्ये मोठ्या प्रमाणात पेटलेल्या वाहनांमुळे प्रचंड धूर पसरला होता. जवानांनी आत कोणी अडकल्याची खात्री करून, धुरामुळे अडकलेल्या एका व्यक्तीला सुखरूप बाहेर काढले. त्यानंतर श्वसनयंत्र परिधान करून जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सुमारे अर्धा तास प्रयत्न




केले. अखेर आग आटोक्यात आणून कुलिंग ऑपरेशन सुरू ठेवण्यात आले.

या आगीत सर्व्हिस सेंटरमधील इलेक्ट्रिक व पेट्रोल वाहनांसह, वायरिंग, यंत्रसामग्री, बॅटऱ्या, सुटे भाग, संगणक, कार्यालयीन साहित्य यासह मोठे नुकसान झाले आहे. आगीचे नेमके कारण समजू शकले नसून, वरिष्ठ अधिकारी विजय भिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई पार पडली. घटनास्थळी पोलिस व महावितरणचे कर्मचारी उपस्थित होते.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न झाली, बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रशासक शेखर सिंह होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती घेत आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली व शहरात सुरु असलेल्या विकासकामांचा विभागनिहाय आढावाही घेतला.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर,नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.



आज झालेल्या स्थायी समिती बैठकीत पी एम पी एल संस्थेस विविध पासेसची रक्कम अदा करणे, ड गटातील वाहनांच्या दुरुस्ती कामी निविदा कालावधीत मुदतवाढ देणे, प्रभाग क्रमांक ८ मधील विविध कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था करणे या कामाच्या सुधारित अंदाजपत्रकात मान्यता देणेकामी महानगरपालिकेच्या सभेकडे शिफारस करणे, अ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक १५ मधील पाणीपुरवठा दुरुस्ती व नवीन जलवाहिन्या टाकण्याकरिता खोदण्यात आलेल्या चेंबरचे डांबरीकरण करणे, पिंपरी चिंचवड मनपा शास्त्रातील दत्तनगर दिघी येथील मंडपाचे सभामंडप बांधणे, ह क्षेत्रीय कार्यालय परिसरातील स्वच्छतागृह देखभाल दुरुस्ती व साफसफाईच्या कामाकरिता लहान जेटिंग मशीन खरेदी करणे, ह क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील औष्णिक धुरीकरणासाठी चार रिक्षा टेम्पो वाहन इंधन व वाहन चालकास प्रतिदिन भाड्याने घेण्याच्या निविदेस मुदतवाढ देणे, पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करणे बाबत पीओपी गणेश मूर्तींचे शास्त्रोक्त विघटन करणेकामी पर्यावरण अभियांत्रिकी विभागामार्फत अमोनियम बायकार्बोनेट या रसायनाची शासकीय दराने खरेदी करणे, महाराष्ट्र शासन नगरपरिषद प्रशासन संचालनायमार्फत उपलब्ध होणारी रिसायकल वाहने पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत करणे व सन २०-२५ चे अंदाजपत्रकामध्ये वाढ घट करून तरतूद करणे, फ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विविध उद्यान देखभाल करणे, महानगरपालिका कर्मचाऱ्यांना अवकारिका चित्रपट दाखविण्यासाठी आलेल्या खर्चास मान्यता देणे आदी विषयांना येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

# माऊली भक्तांसाठी आनंदाची बातमी! मेट्रो थेट आळंदीपर्यंत आणणार: केंद्रीय राज्यमंत्री मंत्री मुरलीधर मोहोळ यांचे आश्वासन

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातील मेट्रोचं जाळं विस्तारताना दिसत आहे. शहरात विविध ठिकाणी नवे मेट्रो स्थानके उभारण्याची काम जलद गतीने सुरू आहे. तर काही नव्या मेट्रो मार्गिकांना हिरवा कंदील मिळाल्याने तेही कामं सुरू आहे. खरंतर पुण्यात आजच्या घडीला सर्वांत जास्त भेडसावणारी प्रश्न आहे तो म्हणजे वाहतूक कोंडीचा. वाहतूक कोंडीमुळे पुणेकर हैरान झाले आहेत. यावर पर्याय म्हणून पुणे मेट्रोची सेवा सुरू करण्यात आली आहे. पण अजूनही काही ठिकाणी मेट्रोची सेवाची पोहचलेली नाही.

आता नुकत्याच एका कार्यक्रमात पुण्याचे खासदार




आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी माऊली भक्तांसाठी मोठं आवाश्वन दिलं आहे. शहरातील वाहतुकीची वाढती कोंडी लक्षात घेता पुणे-आळंदी मेट्रोची गरज जाणवत आहे. तर पुण्यात मेट्रोचे काम गतीने सुरू आहेत. पुण्यात चालू असून कळस-धानोरी मेट्रो डीपीआर मंजूर झाला आहे. यामध्ये आळंदीचा समावेश केला जाईल आणि केंद्र आणि राज्य शासनाच्या मदतीने हा प्रकल्प आता लवकरच प्रत्यक्षात उतरेल, असं विधान केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केलं आहे.

ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी मंदिराचे २२ किलो वजनाचा सुवर्ण कलशारोहण करण्यात आले. या कार्यक्रमात मुरलीधर मोहोळ यांनी वरील विधान केलं आहे. सुवर्ण कलशासमवेत उभारलेल्या ध्वजाचे पूजन मोहोळ यांच्या हस्ते रविवारी दि. २४ ऑगस्ट या दिवशी करण्यात आले. यावेळी त्यांनी आळंदीपर्यंत मेट्रो आणण्याचं आश्वासन दिलं. त्यांच्या या विधानामुळे आता माऊली भक्तांना मेट्रोतून प्रवास करण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे.

नेमकं काय म्हणाले मंत्री मुरलीधर मोहोळ?

पुण्यात मेट्रोचे काम चालू आहे. कळस धानोरी मेट्रो डीपीआर मंजूर झाला आहे. त्यामध्ये आळंदीचा समावेश असणार आहे. देवस्थानचा ज्ञानपीठाचा ही विचार मुख्यमंत्री यांनी जाहीर केला आहे, असं मोहोळ म्हणाले आहेत.

# विद्यार्थ्यांच्या हातून साकारले पर्यावरणपूरक बाप्पा!

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अंतर्गत शाळांमध्ये गणेशोत्सवाचे औचित्य साधून पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत शाडू माती आणि कागदापासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत आपल्या

कल्पनाशक्तीला व कलागुणांना वाव देत पर्यावरणपूरक गणेश मूर्ती तयार केली. पर्यावरणपूरक गणेशोत्सवाबाबत जनजागृती करणे, पर्यावरणपूरक मूर्तींना प्रोत्साहन देणे, त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, हे या कार्यशाळेचे मुख्य उद्दिष्ट होते.

कार्यशाळेत शिक्षक व मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक मूर्ती घडविण्याची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष दाखवून दिली. मूर्ती घडवताना कोणती



काळजी घ्यावी, आकारनिर्मिती करताना कोणते बारकावे पाळावेत, मूर्तीची सुरक्षित देखभाल कशी करावी, तसेच मूर्ती विसर्जन करताना पर्यावरणाला हानी पोहोचणार नाही अशा पद्धतींचा अवलंब कसा करावा, याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना फक्त गणेशमूर्ती बनविण्याची कला नाही तर पर्यावरण संरक्षणाची जबाबदारीही समजावून सांगण्यात आली. शाळांमध्ये आयोजित या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. शाडू माती व कागदापासून प्रत्यक्ष काम करताना त्यांनी आपल्या कल्पनाशक्तीचा वापर करून विविधरंगी बाप्पा साकारले.

विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक साकारलेला बाप्पा म्हणजे केवळ मूर्ती नव्हे, तर हरित विचारांचा पाया आहे. या छोट्याशा कृतीतून मोठा संदेश दडलेला आहे. आनंद साजरा करताना निसर्गाचे रक्षण करणे आपली जबाबदारी असून हा संदेश देण्यासाठी अशा कार्यशाळा उपयुक्त ठरतात.

– प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका


विद्यार्थ्यांच्या हातून साकार झालेल्या पर्यावरणपूरक मातीच्या गणेशमूर्ती केवळ कला नाहीत, तर पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देतात. कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत आपल्या कल्पनाशक्तीला व कलागुणांना वाव देत पर्यावरणपूरक गणेश मूर्ती तयार करीत एकप्रकारे पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश दिला आहे.

– किरणकुमार मोरे, सहायक आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# पुणे रेव्ह पार्टी प्रकरण: नाथभाऊंच्या मुलीच्या अडचणीत वाढ; रोहिणी खडसेंवर गुन्हा दाखल होणार?

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे रेव्ह पार्टी प्रकरणी माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई आणि ॲड. रोहिणी खडसे यांचे पती डॉ. प्राजंल खेवलकर यांना अटक झाल्यानंतर त्यांच्यावर सातत्याने गंभीर आरोप करण्यात येत आहे. त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. या गुन्ह्यात खेवलकर यांच्या मोबाईलमध्ये पोलिसांना महिलांचे आक्षेपार्ह व्हिडिओ आणि फोटो मिळून आले होते. यामुळे एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणाबाबत एक मोठी अपडेट समोर आली आहे. प्रांजल खेवलकर यांच्या पत्नी रोहिणी खडसे यांच्यावरच गंभीर आरोप करण्यात आले आहेत.



पतीला वाचवण्यासाठी रोहिणी खडसे यांनी पुराव्यांची छेडछाड केल्याचा गंभीर आरोप त्यांच्यावर करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्यावरही गुन्हा दाखल होऊ शकतो, अशी माहिती मिळत आहे. पती प्रांजल खेवलकर यांना चुकीच्या प्रकरणात अडकवले गेले आणि यामागे मोठे षडयंत्र असल्याचा दावा रोहिणी खडसे यांनी केला होता. तसेच योग्य वेळी उत्तर देईन, असं देखील त्या म्हणाल्या होत्या. याशिवाय पतीला वाचवण्यासाठी त्या थेट कोर्टात देखील पोहोचल्या. मात्र, खेलवकरांना दिलासा मिळालेला नाही. त्यामुळे आता त्यांच्या पत्नी रोहिणी खडसे यांच्या अडचणी वाढणार असल्याचे बोलले जात आहे.

पतीला वाचविण्यासाठी धडपड पण.

पुणे रेव्ह पार्टी प्रकरण पुण्यातच नव्हे तर राज्यभरात गाजले. या प्रकरणात एकूण सात जणांना अटक करण्यात आली होती. या गुन्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिलाध्यक्षा रोहिणी खडसे यांचे पती डॉ. प्रांजल खेवलकर यांना अटक करण्यात आली. मागील काही दिवसांपासून पतीला वाचवण्यासाठी रोहिणी खडसे धडपड करताना दिसत आहेत. त्यांनी या प्रकरणी पुणे पोलिस आयुक्तांची भेट घेतली. त्यांनी कोठडीत जाऊन पतीसोबतही संवाद साधला. या काळात त्यांनी शरद पवार यांची देखील भेट घेतली होती.